cmyk

## संपादकीय

### नव्या साम्राज्यवादाचा दर्प

जगभरात ख्रिसमसची धामधूम सुरू असताना ट्रम्प यांनी पहिल्यांदा हे विधान केले होते. ट्रम्प यांच्या एकूण स्वभावाकडे पाहता तो गमतीचा विषय मानला जाऊ शकतो. तथापि, ट्रम्प यांनी नंतरही आपली हीच भूमिका मांडली आणि आताही त्याचा पुनरुच्चार केला. त्यांच्या बोलण्यातून विस्तारवादाचा किंवा नव्या साम्राज्यवादाचा दर्प येतो आहे. 'माझा घोडा तुम्ही अडवा आणि युद्ध करा अन्यथा माझे मांडलिकत्व पत्करा' असाच अर्थ त्यातून प्रतीत होतो. ट्रम्प किंवा त्यांची भावी अमेरिका कॅनडाबाबत खरेच असे करू शकते का, या प्रश्नाचे उत्तर 'हो' आहे. त्यांनी पूर्वीही तसे केले आहे आणि आताही ते करण्यात त्यांना फारशी अडचण संभवत नाही.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com





बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२६१ सोमवार, दि.१३ जानेवारी २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

# शासकीय हरभरा खरेदीचा मुहूर्त लवकर करा !

## शेतकऱ्यांची सरकारकडे मागणी, गतवर्षी शेतकऱ्यांचे नुकसान

**पुणे । प्रतिनिधी**

**शासकीय हरभरा खरेदीचा मुहूर्त यंदा लवकर करावा. हरभरा विक्रीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी अधिक होते. परंतु खरेदी मे महिन्यात केली जाते. पुढील महिन्यातच किंवा मार्चमध्येच खरेदी केंद्र सुरू होतील, अशी व्यवस्था करावी, असा मुद्दा शेतकरी उपस्थित करीत आहेत.**

हरभरा विक्रीसाठी राज्यात मोठा प्रतिसाद शासकीय केंद्रांत मिळतो. बाजारात हरभऱ्याचे दर हमीभावाच्या जवळपास नसतात. सध्या दर ४५०० ते ४६०० रुपये प्रतिक्विंटल एवढे आहेत. त्यात पुढे किती वाढ होईल, याबाबत अंदाज देता येत नाही. यामुळे शासकीय केंद्रात हरभरा विक्रीसंबंधी नोंदणीला लवकर सुरुवात करावी व हमीभावात हरभरा खरेदीस लवकर सुरुवात करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. नोंदणीला चांगला प्रतिसात लाभल्यानंतर खरेदीचे नियोजन प्रशासनाकडून पान २ वर



### काबुली हरभऱ्यासाठी स्वतंत्र दर द्या

खरेदी केंद्र संख्या पुरेशी असते. पण खरेदी उशिरा सुरू केली जाते. शासकीय केंद्रात काबुली हरभऱ्यासाठी स्वतंत्र दर असावेत. काबुली हरभऱ्याचे दर बाजारात ८५०० ते १०००० रुपये प्रतिक्विंटल, एवढे असतात. यामुळे शासकीय केंद्रात काबुली हरभऱ्याची खरेदी करण्यासाठी स्वतंत्र दर असावेत, असाही मुद्दा उपस्थित केला जात आहे.

## संत भगवानबाबांची ५९ वी पुण्यतिथी १४ जानेवारीला

**बीड प्रतिनिधी**



**विसाव्या शतकातील महान संत वै. ह.भ.प. श्री भगवानबाबा यांची ५९ वी पुण्यतिथी यावर्षी मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होणार आहे.**

याविषयी सविस्तर माहिती अशी की बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक आणि पहिले महंत ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबा यांची ५९ वी पुण्यतिथी यावर्षी १४ जानेवारी रोजी येत आहे. गडाच्या परंपरेनुसार संत भगवानबाबांच्या समाधीचा महाभिषेक सकाळी होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ ते २ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन होईल. त्यानंतर आलेल्या समस्त भाविकांना महाप्रसाद देण्यात येणार आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी संत भगवानबाबांचे देशभरातील भाविक भक्त बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. श्री क्षेत्र भगवानगडावर संत भगवानबाबा यांचे स्वप्न असणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचे भव्यदिव्य मंदिर महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. पान २ वर

# वाल्मिक कराडवर मोक्का लावून ३०२ च्या गुन्ह्यात आरोपी करा !

## मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक ; आज टॉवरवर चढून आंदोलन तर उद्या आत्मदहनाचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या घटनेला आता महिना उलटून गेला आहे. या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली असून, वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणातील आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे. मात्र या प्रकरणात वाल्मिक कराडवर मोक्का न लावण्यात आल्याने मस्साजोगचे ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले आहेत. यासाठी १३ जानेवारीला ग्रामस्थांच्या वतीने टॉवरवर चढून आंदोलन करण्यात येणार आहे, तर १४ जानेवारीला मकर संक्रातीच्या दिवशी आत्मदहनाचा इशारा देण्यात आला आहे.**



मकर संक्रांतीच्या दिवशी मस्साजोगचे ग्रामस्थ सामूहिक आत्मदहन आंदोलन करणार आहेत. मस्साजोग येथील महादेव पान २ वर

### आरोपी माझा देखील खून करतील – धनंजय देशमुख

वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करा, त्याच्यावर देखील हत्येचे ३०२ कलम लावा. नाहीतर हे आरोपी माझा देखील खून करतील. जर त्याच्यावर मोक्का लागला नाही तर सोमवारपासून आम्ही टॉवरवर जाऊन आंदोलन करणार आहोत. मी स्वत:लाच संपवून घेतो, म्हणजे माझ्या भावाला तरी समाधान मिळेल की माझा भाऊ सत:हूनच संपला, त्याला आपल्या सारखे मारले नाही, असे धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे. दरम्यान, धनंजय देशमुख यांनी आता आंदोलनाचा इशारा दिल्यामुळे वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

### हार्वेस्टिंग मशीन अनुदान फसवणूक प्रकरणी १९ जणांचे तक्रारी अर्ज

वाल्मिक कराड याने ऊस हार्वेस्टिंग करणाऱ्या मशीन मालकांना अकरा कोटी वीस लाखाची टोपी घातल्याचा प्रकार उघड झाल्यानंतर आता यामध्ये वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे या दोघांच्याही अडचणी वाढण्याची शक्यता आहे. याबाबत शनिवारी रात्री उशिरा पंढरपूर परिसरातील फसवणूक झालेल्या १९ मशीन मालक शेतकऱ्यांचे जबाब पोलिसांनी नोंदवून घेतले असून त्यांच्याकडून तक्रारी अर्ज दाखल केले आहेत. आता या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार असून या ११ कोटी २० लाखाची फसवणूक झालेल्या सर्व मशीनधारकांना त्यांच्या जवळील पुरावे सादर करण्यास सांगितले आहे. यातील तथ्य तपासून पुढील दोन दिवसात वाल्मिक कराड, जितेंद्र पालवे आणि नामदेव सानप यांच्यावर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

# जिजाऊंच्या जयघोषाने जन्मोत्सव सोहळा उत्साहात

## राजगडाची दरी–खोरी दुमदुमली ; विरोधीपक्षनेत्यांसह आजी माजी आमदार उपस्थित

**वेल्हे । वृतसंस्था**

**किल्ले राजगड पायथा पाल बुद्रुक (ता.राजगड) येथे राजमाता जिजाऊंच्या जयघोषाने ,शाहिरी पोवाडे, शिवकालीन मर्दानी खेळ, पालखी मिरवणूक, पारंपरिक वाजंत्री, ढोल ताशाच्या निनादाने राजगडाची दरी–खोरी दुमदुमून गेली होती. रविवार (दि.१२) रोजी जिजाऊंच्या ४२७ व्या ऐतिहासिक जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहाने पार पडला.**



विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार शंकर मांडेकर,माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यासह महिला, जिजाऊ भक्त, वयोवृद्ध, शिवप्रेमी, वारकऱ्यांनी जिजाऊंना मानवंदना दिली. किल्ले राजगड पायथ्याशी दोन वेगवेगळया ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिजाऊ सृष्टी प्रतिष्ठान पाल खुर्द येथे विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन ह.भ.प.रोहिदास महाराज हांडे यांनी केले होते कार्यक्रमाचे हे अकरावे वर्षे होते. तर मावळा जवान संघटना पाल खुर्द येथे अठरापगड मावळ्यांच्या वतीने सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.याठिकाणी आमदार शंकर मांडेकर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकांची शासकीय महापूजा करण्यात आली. रायरेश्वर शिवपिठाचे शिवाचार्य सुनिल महाराज जंगम यांच्या शिव वदनेने सोहळ्यास सुरुवात झाली. यावेळी राजगड तालुका तहसीलदार निवास ढाणे,जिल्हा दुध संघाचे अध्यक्ष भगवान पासलकर,सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज सुरेश मोहिते, सरनौबत येसाजी कंक यांचे वंशज संजय कंक, सरदार झुंजारराव मरळ वंशज प्रताप मरळ,, माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे, दिनकर धरपाळे, आनंद देशमाने, माजी सभापती दिनकर सरपाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष पान २ वर

# डंपरने चिरडल्याने सरपंचाचा जागीच मृत्यू; सुरेश धस पुन्हा आक्रमक




**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर महिन्याभरात पुन्हा एकदा बीड जिल्हा हादरला आहे. राखेची अवैध वाहतूक करणाऱ्या टिप्परने त्यांना चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अभिमन्यू क्षीरसागर असे मृत्यू झालेल्या सरपंचाचे नाव आहे. ते सौंदना गावचे सरपंच होते. मिरवट फाट्यावर हा भीषण अपघात झाला. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून हा अपघात की घात आहे, याचा तपास पोलीस करीत आहेत.**

शनिवारी रात्री सरपंच अभिमन्यू क्षीरसागर हे आपल्या दुचाकीवरून पान २ वर

### "हा घातपात होता का? याची चौकशी झाली पाहीजे" सुरेश धस

परळीतील औष्णिक विद्युत प्रकल्पातून निघणाऱ्या राखेची अवैध वाहतूक आणि व्यवसाय होत आहेत. याच राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने धडक दिल्याने सरपंच क्षीरसागर यांचा जागेवरच मृत्यू झाला. हा घातपात होता का? याची चौकशी झाली पाहीजे. संतोष देशमुख प्रकरण झाल्यानंतरही अवैध राखेची वाहतूक करणारे टिप्पर बंद झालेले नाहीत. याला परळी पोलीस, औष्णिक विद्युत प्रकल्पाचे अधिकारी जबाबदार आहेत, असे धस म्हणाले.

## नियमात न बसणाऱ्या लाडक्या बहिणींकडून दंडासह वसुली करा - छगन भुजबळ



**नाशिक । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा फायदा काही प्रमाणात नको त्यांना झाला आहे. काही प्रमाणात हे खरे आहे. मात्र या वेळी नियम काही वेगळे आहेत. त्यात एका घरात दोन महिलांना देता येत नाही, मोटार गाडी असेल तर त्यांना देता येणार नाही. गरीबांना त्याचा लाभ झाला पाहिजे हा या योजनेचा उद्देश आहे. जे नियमात बसत नाही त्यांनी स्वत:हून आपले नावे काढले पाहिजे. जे पैसे दिले गेले आता ते परत मागण्यात काही अर्थ नाही, ते आता मागण्यात येवू नये. मागे जे झाले ते पान २ वर

# शरद पवार–उद्धव ठाकरे यांना जनतेने त्यांची जागा दाखवली

## भाजपाच्या महाअधिवेशनात अमित शाह कडाडले

**शिर्डी । प्रतिनिधी**

शरद पवारांच्या दगफटाक्याच्या राजकरणाला संपवण्याचे काम महाराष्ट्राने केले आहे. तसेच हिंदुत्व आणि बाळासाहेबांच्या विचारांशी द्रोह करणाऱ्या उद्धव ठाकरेंना जनतेने जागा दाखवली. घराणेशाहीला झुगारुन सिद्धांताचे राजकारण



चालते हे तुम्ही दाखवून दिले, अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ले चढवले.

शिर्डी येथे भाजपाचे महाअधिवेशन सुरु आहे. यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री पान २ वर

## २३ मार्चपासून आयपीएलचा धमाका

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

नव्या वर्षाच्या सुरुवातीनंतर क्रिकेटप्रेमींना आता आयपीएलच्या आगामी पर्वाची उत्सुकता लागली आहे. सगळेच क्रिकेटप्रेमी आपापल्या संघाच्या विजायासाठी आतापासूनच प्रार्थना करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून या वर्षाचा आयपीएल नेमका कधीपासून चालू होणार? हे विचारले जात होते. असे असतानाच आता आयपीएल २०२५ च्या पहिल्या समान्याची तारीख समोर आली आहे. खुद्द बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनीच त्याबाबतची ठोस माहिती दिली आहे.

बीसीसीआयच्या सचिवपदी माजी क्रिकेटर देवजीत सैकिया यांची निवड करण्यात आली. तसेच बीसीसीआयच्या कोषाध्यक्षपदी प्रभजीत सिंग भाटीया यांची निवड पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.०० क्विंटल | २,६३१ | २,७०० | २,६६५ |
| ज्वारी/हायब्रिड: २७.५० क्विंटल | १,९५१ | २,३५० | २,१०९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :११७.५० क्विंटल | ६,५०० | ७,२२० | ६,८८२ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५७५ | ६,५३८ |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,५३५ | ३,०५५ | २,७९५ |
| मुग : २.५० क्विंटल | ६,३०० | ७,२०० | ६,७५० |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ३,४६१ | ४,१५० | ४,०१६ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |

# सरकारच्या स्त्री केंद्रीत योजनांमुळे १.८ कोटी महिला मतदान प्रक्रियेत सक्रिय

## केंद्राच्या बहुतांश योजना महिला केंद्रीत योजना, एसबीआयच्या अहवालातून स्पष्ट

**पुणे । प्रतिनिधी**

**२०२४ च्या भारतातील लोकसभा निवडणुकीत एक शांत क्रांती घडली, जी ज्वलंत रॅली किंवा राजकीय घोषणांनी नव्हे तर महिलांसाठीच्या कल्याणकारी योजनांच्या परिवर्तनकारी शक्तीने घडवली. साक्षरता कार्यक्रम, गृहनिर्माण उपक्रम, स्वच्छता मोहीम आणि मुद्रा कर्ज हे बदलाचे अशक्य शिल्पकार बनले, ज्यामुळे १.८ कोटी अतिरिक्त महिला मतदानाच्या चौकटीत आल्या आणि देशाच्या लोकशाही परिदृश्याला अशा प्रकारे आकार देण्यात आला की ज्याकडे आता दुर्लक्ष करता येणार नाही.**




भारतीय निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवर आधारित एसबीआयच्या ताज्या अभ्यासानुसार, साक्षरता, स्वच्छता, मुद्रा कर्ज आणि गृहनिर्माण मालकीला प्रोत्साहन देणाऱ्या कार्यक्रमांनी महिलांना निवडणूक प्रक्रियेत अधिक सहभागी होण्यास कसे सक्षम केले हे दाखवून दिले. केवळ साक्षरतेत १% वाढ झाल्याने ४५ लाख अधिक महिला मतदार झाले, तर प्रधानमंत्री आवास योजने (पीएमएवाय) अंतर्गत घराच्या मालकीमुळे २० लाख अतिरिक्त मतदार झाले. प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय), ज्यामध्ये ७४% घरे महिलांच्या नावाखाली नोंदणीकृत होती. एकट्याने किंवा संयुक्तपणे परिवर्तनकारी ठरली. सुरक्षित घरांमुळे महिलांना केवळ आश्रय मिळाला नाही तर ओळख आणि एजन्सीची भावना देखील मिळाली, ज्यामुळे निवडणूक सहभाग वाढला, असे अहवालात आढळून आले. साक्षरता उपक्रमांनी आणखी व्यापक परिणाम दर्शविला, साक्षरता दरात १% वाढ महिला मतदारांच्या मतदानात २५% वाढीशी संबंधित आहे. या यशांचा आनंद साजरा करताना, एसबीआय रिसर्च अहवालात अत्यधिक कल्याणकारी खर्चाविरुद्ध इशारा देण्यात आला आहे, असे सुचवण्यात आले आहे की ते राज्याच्या सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (जीएसडीपी) १% पेक्षा जास्त पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नव्या साम्राज्यवादाचा दर्प

जगभरात ख्रिसमसची धामधूम सुरू असताना ट्रम्प यांनी पहिल्यांदा हे विधान केले होते. ट्रम्प यांच्या एकूण स्वभावाकडे पाहता तो गमतीचा विषय मानला जाऊ शकतो. तथापि, ट्रम्प यांनी नंतरही आपली हीच भूमिका मांडली आणि आताही त्याचा पुनरूच्चार केला. त्यांच्या बोलण्यातून विस्तारवादाचा किंवा नव्या साम्राज्यवादाचा दर्प येतो आहे. 'माझा घोडा तुम्ही अडवा आणि युद्ध करा अन्यथा माझे मांडलिकत्व पत्करा' असाच अर्थ त्यातून प्रतीत होतो. ट्रम्प किंवा त्यांची भावी अमेरिका कॅनडाबाबत खरेच असे करू शकते का, या प्रश्नाचे उत्तर 'हो' आहे. त्यांनी पूर्वीही तसे केले आहे आणि आताही ते करण्यात त्यांना फारशी अडचण संभवत नाही.

कॅनडाला आपले ५१ वे राज्य केल्यावर कॅनडाचाच कसा फायदा आहे हे ट्रम्प यांनी ऐकवले आहे. कॅनडात सध्या स्थिती चांगली नाही. ज्या ट्रुडोंना ट्रम्प यांनी जाहीर प्रस्ताव दिला होता त्यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या दोन देशांचे सहअस्तित्व असले तरी आजपर्यंत अशा प्रकारचा प्रस्ताव मांडला गेला नव्हता, ना त्याबाबत कधी बोलणी झाली होती. त्याचे कारण दोन्ही देशांची असलेली ऐतिहासिक मैत्री. ही मैत्री किंवा परस्परविश्वास किती घट्ट आहे याचा अंदाज केवळ एकाच गोष्टीवरून करता येऊ शकतो ते म्हणजे दोन्ही देशांत जगातील सगळ्यांत मोठी सीमारेषा आहे. मात्र, ती खुली ठेवण्यात आली आहे. त्यात कुठलेही कुंपण आणि पहारा नाही किंवा कोणता वादविवादही नाही. स्थलांतर अथवा इमिग्रेशन आणि वातावरण बदल आदी मुद्द्यांवरून अमेरिका व कॅनडात काही मतभेद आहेत. तथापि, भाषा आणि संस्कृती समान असल्यामुळे सीमा वेगळ्या असल्या तरी दोन्ही देश एकरूप असल्यासारखीच स्थिती आहे. किंचित मतभेद असले तरी संबंध मैत्रीचे आणि शांततापूर्ण आहेत. ट्रम्प यांचे पूर्वसूरी आणि नंतरचे बायडेन यांनी कॅनडाबाबत 'जैसे थे' ठेवले होते. आता ट्रम्प यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच अचानक या विषयाला हात घातल्यामुळे चर्चा सुरू झाली आहे. ही चर्चाही सामान्य असल्याचे दिसते. कॅनडात त्याचे संतप्त पडसाद अथवा साधे पडसादही उमटले नाहीत. आमच्या सार्वभौमत्वावर हल्ला वगैरे विधानेही कोणी केली नाही. हे सगळे असे दर्शवते आहे का, की कॅनडालाही ट्रम्प यांचा प्रस्ताव मान्य आहे? खुद्द अमेरिकेत याबाबत काय भूमिका आहे? एका देशाचे विलीनीकरण करायचे असल्यास स्वाभाविकच काही प्रक्रिया आहेत. दोन स्वतंत्र देश असल्यामुळे तेथे स्वतंत्र संसद आहेत आणि त्यांचे संविधानही आहेत. त्यानुसार विचार करता कॅनडाला जर अमेरिकेत समाविष्ट हायचे असेल तर कॅनडाच्या संसदेची म्हणजे सिनेट आणि हाउस ऑफ कॉमन्सची संमती घ्यावी लागेल. शिवाय देशातील सर्व १० राज्यांच्या विधानसभांची मंजुरी आवश्यक असेल. तेथे अनेक पक्ष आणि मतप्रवाह आहेत. त्यामुळे अमेरिकेत विलयाच्या संदर्भात चटकन सहमती होईलच असे नाही. शिवाय त्यांच्या संविधानात अशीही तरतूद आहे की कॅनडातील एखाद्या भागाला जर अमेरिकेत जायचे नसेल तर तो भाग तसे करू शकतो पण; त्यांनाही हीच सगळी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

अमेरिकेत कॅनडाला सामील करून घेण्यास कोणाची ना असण्याचे कारण नाही. मुळात त्या देशाने आपल्या संपन्नतेच्या जोरावर पूर्वीही असे केले आहे व कोणत्याही लष्करी बळाचा वापर न करता वेगवेगळे प्रदेश आपल्यात सामावून घेतले आहेत. यातील काहींनी स्वेच्छेने अमेरिकेत विलय करून घेतला आहे. हवाई, टेक्सास, लुईसियाना आदी प्रांत त्याची ठळक उदाहरणे. यातील कोणी पूर्वी फ्रान्सचा भाग होते तर कोणी मेक्सिकोचा. ते अमेरिकेत समाविष्ट झाले. गमतीचा भाग म्हणजे अमेरिकेची राजकीय राजधानी असलेला भाग वॉशिंग्टन डीसी राजधानी तर आहे मात्र पूर्ण राज्य नाही.

स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा यासाठी प्रदीर्घ काळापासून त्यांचे प्रयत्न सुरू असले तरी सहमती झालेली नाही. वॉशिंग्टन डीसी कोणत्या एका राज्याच्या अधिकारात असू नये व या भागाने संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करावे अशी अमेरिकेच्या संसदेची भूमिका आहे. त्यामुळे हा विषय रखडला आहे व तसाच पोर्टो रिकाचाही. तेही राज्याचा दर्जा मिळण्यासाठी रांगेत उभे आहेत. लुईसियानाप्रमाणे अमेरिका कॅनडाची खरेदी करून त्याला आपले राज्य बनवू शकते. मात्र, हा मानहानीचा प्रकार अधिक होईल त्याचे कारण कॅनडा संपन्न आहे व त्यांची स्वत:ची एक प्रतिष्ठा आहे. ट्रम्प ज्या आत्मविश्वासाने कॅनडाबाबत बोलत आहेत व त्यावर कोणते वादळही निर्माण झाले नाही यावरून खरेच कॅनडा अमेरिकेचे राज्य झाले तर ते धक्कादायक नसेल असे आज म्हणता येऊ शकते. प्रश्न राहतो तो हाच की अमेरिका जे कथित प्रेमाने करते आहे तेच रशिया लष्करी बळाने आणि चीन कर्ज देऊन करण्याचा प्रयत्न करते आहे. या नव्या साम्राज्यवादाला जर अधिकृतता प्राप्त झाली, तर जगात कोणीही कोणाचा घास घेण्यासाठी मोकळे असेल आणि आडकाठी करणारेही कोणी नसेल.

---

## मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान अतुलनीय -डॉ.भालचंद्र कुलकर्णी

माजलगाव । पतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद संस्थानामध्ये सामान्य लोकांसाठी कार्य करताना शैक्षणिक सामाजिक प्रबोधन करण्यासाठी अथक प्रयत्न केले.त्यामुळे ही चळवळ स्वातंत्र्य लढा झाली.असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भालचंद्र कुलकर्णी यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ आणि भा शि.प्र.संस्था अंबाजोगाई संचलित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक व भा.शि.प्र संस्था केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी,विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख डॉ प्रे.म. राठोड यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.स्वातंत्र्य उत्तर काळात मराठवाडा प्रदेशाच्या विकासात स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान या विषयी सविस्तर मांडणी करताना ते म्हणाले की,मराठवाडा मुक्ती संग्रामचा लढा हा स्वातंत्र्याचा अखेरचा लढा होता या लढ्यामध्ये शिक्षकांचा सक्रीय सहभाग होता त्यामुळे मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासात स्वामी रामानंद तीर्थ यांनी अंबाजोगाई,नांदेड या भागामध्ये भरीव योगदान देत लोकांचा शैक्षणिक विकास साधत त्यांचे राष्ट्रीयत्व जागे केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी म्हटले की, तरुण पिढीसमोर आपल्या भागातील वीरांचा इतिहास समोर ठेवून त्यापासून प्रेरणा देण्याचा स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा उद्देश आहे.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संकुलाचे पालक व भा शि. प्र.संस्थेचे केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड म्हणाले की, मराठवाड्याला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी प्रयत्न केला. त्यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ अग्रणी होते.अशा वीरांच्या गाथा व्याख्यानातून स्मरण केल्या तरच तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती जागृत ठेवता येईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ जिजाराम बागल यांनी केले.तसेच कार्यक्रमात मान्यवरांचे आभार कल्याण मंत्र डॉ प्रेम राठोड यांनी केले. या व्याख्यानास बहुसंख्य प्राध्यापक, कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

---

# शेत बंधाऱ्याचे कोट्यावधी रुपयाचे काम होतेय बोगस

## महसूलमंत्री यांनी लक्ष द्यावे; अन्यथा, आमरण उपोषणास करणार

मंठा । प्रतिनिधी

**तळणी (ता. मंठा) शिवारातील सरस्वती ओढ्यावर शेत बंधाऱ्यासे सुरू असलेले कोट्यवधी रूपयांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याने शासनाचा हा पैसा पाण्यातच जाणार आहे. त्यामुळे सदरील कामाकडे महसुलमंत्री विखे पाटील यांनी लक्ष द्यावे आणि हे काम चांगल्या दर्जाचे करून घ्यावे; अन्यथा २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसू, असा इशारा ग्राहक रक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार यांनी दिला आहे.**



शासकीय नियमाप्रमाणे दर्जेदार न करता निकृष्ट दर्जाचे केले जात आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी जालना यांच्यामार्फत महसूल मंत्री विखे यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तळणी शिवारातील सरस्वती ओढ्यावर शेत बंधाऱ्याचे कामे कामासाठी वापरले जाणारे साहित्य निकृष्ट असून, सध्या दगड, गिट्टी भरणे सुरू आहे. त्या ठिकाणी सळाईचा वापर करण्यात येत नसल्याचेदेखील निदर्शनास आले आहे. ट्रॅक्टरने हायड्रोलिक करून मशिनच्या सहाय्याने माल टाकला जात आहे. जर त्याचा पाया पक्का नसला तर बंधारे टिकणार कसे? शासनाने जो लाभ दिलेला आहे, त्याचा योग्य प्रकारे उपयोग झाला पाहिजे. तळणी गावापासुन २ किलोमिटर अंतरावर हे काम सुरू आहे. ते विदर्भ सीमेवर असल्याने कोणताही अधिकारीवर्ग येवून चौकशी अथवा पाहणी करत नाही. अभियंत्याने कार्यारंभ आदेश देऊन काम चालु केले. काम जसे पाहिजे तसे होत नाही; मग शेतकऱ्यांना काय फायदा होणार हा प्रश्न आहे. शासनाची दिशाभुल करून फक्त पैसे कमावण्याचा हेतु आहे. शासनाने दिड कोटी रुपये या कामासाठी मंजूर केले आहेत. सिंचनासाठी या भागातील खडकाळ शेत असलेल्या शेतकऱ्यांच्या विहिरीला मुबलक पाणी राहील हा त्यामागील शुद्ध हेतू आहे. शेत बंधारा दर्जेदार झाला तर परिसरातील दीडशे ते २०० शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो. मात्र या कामात वाळू आणि कचचा पुरेसा वापर केला जात नसून निव्वळ राख टाकण्यात येत आहे, त्यात मातीही मिसळली जात आहे. खडक लागेपर्यंत पाया खोलवर घेणे गरजेचे असताना, काळी मातीमध्येच ट्रॅक्टरने दगडे टाकुन पाया बनवला जात आहे. सदरील कामाची चौकशी करावी; अन्यथा प्रजासत्ताकदिनापासून म्हणजेच २६ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसू, होणाऱ्या परिणामाची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर राहील, असा इशारा या निवेदनात कैलास पवार यांनी दिला आहे.

---

# व्हॉईस ऑफ मिडियातर्फे दर्पण दिन उत्साहात साजरा

जालना । प्रतिनिधी

**समोरच्याकडं लक्ष न देता आपल्या कामाकडे लक्ष दिले तरच ते काम व्यवस्थीतरित्या पार पडतं, असे मत ज्येष्ठ छायाचित्रकार तथा बॉम्बे फोटो स्टुडिओचे संचालक बाबुराव व्यवहारे यांनी येथे बोलतांना व्यक्त केले. प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तत्पूर्वी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस मान्यवर पाहुण्यांनी पुष्पहार अर्पण केला.**

यावेळी व्हॉईस ऑफ मिडियाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पहार घालून व पेन देऊन स्वागत केले. यावेळी व्यासपीठार दै. दुनियादारीचे कार्यकारी संपादक भारत धपाटे, संपादक विलास खानापूरे, जेपीसी बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष तथा दै. कृष्णनितीचे संपादक संजय भरतिया, मर्चंड बँकेचे माजी संचालक रविंद्र फुलभाटी, दिकर घेवंदे, रमेश देहेडकर, शेख शफी, सामाजिक कार्यकर्ते तुलजेसभैय्या चौधरी, ज्येष्ठ पत्रकार विनायक दहातोंडे, दैनिक लोकसत्ता जिल्हा प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण राऊत, दै. आंनदनगरीचे कार्यकारी संपादक रविंद्र बांगड, दै. गोकुळनितीचे संपादक अर्पण गोयल, दै राज्य लोकतंत्र जिल्हा प्रतिनिधी शिवाजी मस्के,राजेश भिसे, सीए आकाश मुंदडा, भारत एखंडे, साईनाथ चिन्नादोरे, अहेमद नूर, बद्री उपरे, मधुराम मुळे, राजेश गौड आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली. पुढे बोलतांना श्री. व्यवहारे यांनी आपल्या कार्य काळातील आठवणींना उजाळा दिला. त्यांनी यावेळी मारवाडी आणि राजस्थानी समाजाबद्दल गौरवोद्गार काढून त्यांनी आजच्या आणि कालच्या पत्रकारातेतील फरकही स्पष्ट करुन सांगितला. तर तुलजेसभैय्या चौधरी, दिनका घेवंदे, रमेश देहेडकर, साईनाथ चिन्नादोरे आदींनी आपल्या भाषणातून या कार्यक्रमाबद्दल विकासकुमार बागडी यांचे आभार व्यक्त करुन आज आपण जे काही आहोत, ते पत्रकारांमुळेच असल्याची भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. येथील हॉटेल मधुबनच्या हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमास जालन्यासह मंठा, परतू आणि बदनापूर येथील पत्रकारांसह भरत मानकर, ज्ञानेश्वर ढोबळे, शिवराम बावणे, शिवाजी मस्के, अच्युत मोरे, गणेश काबरा, सुयोग खर्डेकर, लियाकत अली खान, संतोष भुतेकर, अशोक मिश्रा, सदानंद देशमुख, जगदीश शर्मा, सय्यद नदीम, सुनिल नरवडे, भगवान साबळे, भगवान निकम, कैलास फुलारी, शिवप्रसाद दाड, अंकुश गायकवाड, कृष्णा पठाडे, सरफराज नाईकवाडे, एल. एम. कुरेशी, इलियास लखारा, सचिन सर्वे, जिल्हा माहिती कार्यालयाचे संतोष पाखरे, कोंडींबा अनपट, देवचंद सारवे, सय्यद नईम, युवराज कुरील, गोपाल गोमंतीवाले, संदीप गायकवाड, गजानन मालकर, अतुल खरात, महादेव जामकर, नटवर किल्लेदार, संजय भगत, मयुर अग्रवाल, गणेश लुटे, शकीलभाई, प्रताप गायकवाड, सांडू तातडे, मितवा रामरख्या, कादरी हूसेन, विनोद काळे, रामधन खरात, शामसुंदर चितोडा, राहुल गायकवाड, विजय वैष्णव, मुकेश परमार, अनिल व्यवहारे, गौतम वाघमारे, लक्ष्मीचंद जांगडे, श्रीकृष्ण झंवर, आशिश तिवारी, सचिन सर्वे आदी पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी तुलजेस चौधरी यांनी दिवंगत पत्रकार सर्वश्री शशिकांत पटवारी, सुरेंद्र जैस्वाल, रमेश बागडी, उदय पटवारी, शेख अलिम, मनोहर बुजाडे, लक्ष्मण पायगव्हाणे, अबुल हसन, रमण गायकवाड, दिगंबर शिंदे, गणेश जळगांवकर, रमेश पाटील, श्रीकृष्ण भारुका, राजेंद्र तिरुखे, रतनलाल कुरिल, सतीश सुदामे, चंद्रकांत शहाणे यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. शेवटी उपस्थितीचे आभार व्हॉईस ऑफ मिडीयाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी मानले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रविकांत दानम यांनी केले.

---

# राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धा संपन्न

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या महाविद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

बीड । प्रतिनिधी

**तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, बीडच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या व राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून या आदर्श मातांना अभिवादन करण्यात आले.**



या उपक्रमा अंतर्गत शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी बीड शहरातील धानोरा रोड येथील राजयोग मंगल कार्यालय येथे महाविद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष, मा. प्रा. प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक मा. श्रीमती भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंके (फॅशन डिझायनर, शिल्पकार, चित्रकार,छ. संभाजीनगर.), कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. यशवंत कांबळे (प्रसिद्ध उद्योजक, पुणे.) मा. महेश साळुंके ( वास्तुतज्ञ, छ. संभाजीनगर.), तर प्रमुख उपस्थिती मध्ये मा. राम गायकवाड, प्राचार्य डॉ. अशोक धुलधुले( तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड.) उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास परीक्षक म्हणून मा. प्रज्ञा जमधाडे ( लॅक्मे- प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट), मा. जेधे सर ( प्रसिद्ध डिझायनर), यांची उपस्थिती लाभली. यावेळी स्पर्धेत सहभाग म्हणून बीड, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, पुणे मुंबई, ठाणे, यवतमाळ, जळगाव, अहमदनगर, नाशिक, नांदेड आदि जिल्ह्यातील १३० विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला तर कार्यक्रमासाठी खास आवर्जून आपल्या पाल्यांचे कलाकृतीतील कौतुक पाहण्यास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी व डिझाईनर यांनी डिझाईन केलेले डिझाईनिंग ड्रेस मॉडेल्स यांना परिधान करून प्रदर्शित करण्यात आले. यावेळी राज्यातील १३ महाविद्यालय व ८ प्रसिद्ध बुटिक मधील डिझायनर सह अन्य डिझायनर यांनीही हिरारीने सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या वेळी एकूण फर्स्ट राऊंड, सेमी फायनल व फायनल असे राऊंड घेण्यात आले. प्रथम बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम १०००० रुपये, सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र , दुसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ७००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तिसरे बक्षिसाचे स्वरूप- रोख रक्कम ५००० रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते तर इतर सर्व सहभागी डिझायनर यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

---

## पान १ वरून...

### शासकीय हरभरा खरेदीचा

केले जाते आणि या प्रक्रियेला वेळ लागतो त्यामुळे लवकरात लवकर ही प्रक्रिया सुरू करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. गतवर्षी राज्यात नोंदणीला चांगला प्रतिसाद लाभला, परंतु खरेदीचे नियोजन झाले नव्हते. बाजारातही दरात किरकोळ घसरण दिसत होती. यामुळे मागील वेळेस अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान बाजारात हरभरा विक्रीने झाले. यामुळेच यंदा लवकर शासकीय खरेदीस सुरुवात करावी, अशी मागणी केली जात आहे.

-------------

### वाल्मिक कराडवर मोक्का

मंदिरासमोर अंगावर पेट्रोल ओतून जाळून घेत आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे. वाल्मिक कराड याच्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करून मोक्का लावण्यात यावा, आरोपी कृष्णा आंधळे याला तात्काळ अटक करण्यात यावी. शासकीय वकील म्हणून उज्वल निकम किंवा सतीष मानशिंदे यांची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी. कमिटीमध्ये पंकज कुमावत या अधिकाऱ्याची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी. सदरील प्रकरणाचा तपास कुठपर्यंत आलेला आहे? याची माहिती देशमुख कुटुंबियांना देण्यात यावी, केजचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना बडतर्फ करून सहआरोपी करण्यात यावे, अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

-------------

### संत भगवानबाबांची ५९ वी

भगवानबाबांच्या समाधीचे दर्शन आणि माऊली मंदिराचे काम डोळे भरून पाहण्यासाठी भाविकभक्त लांबून येत असतात. आलेल्या भाविकांच्या दर्शनाची आणि महाप्रसादाची चोख व्यवस्था महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गडाचे विश्वस्त मंडळ आणि पंचक्रोशीतील भाविक यांच्या सहभागातून करण्यात येते. महंत नामदेव महाराज शास्त्री यांची ख्याती महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरात ज्ञानेश्वरी भावकथेमुळे पोहोचली आहे. आनंदाचे सिद्धांत सोशल मीडियात प्रचंड लोकप्रिय झाले आहेत. त्यामुळे पुण्यतिथीला न्यायाचार्य महंत नामदेव शास्त्री महाराज यांचे अमृततुल्य कीर्तन प्रत्यक्ष ऐकण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी भगवानगडावर होत असते. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर, राजकीय नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी, अधिकारी आणि भाविक भक्त भगवानबाबांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी भगवानगडावर येतात. भाविकांनी यावर्षी देखील शिस्तीत संत भगवानबाबांच्या पुण्यतिथी सोहळ्याला आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री आणि विश्वस्त मंडळाने केले आहे.

**न्यायमूर्ती गोविंदराव सानप राहणार उपस्थित**

यावर्षीच्या पुण्यतिथी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे सन्माननीय न्यायमूर्ती श्री गोविंदराव सानप हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी श्री क्षेत्र भगवानगडाच्यावतीने त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

-----------

### डंपरने चिरडल्याने सरपंचाचा

जात असताना मिरवट फाट्यावर राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने त्यांना जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला. यात त्यांच्या डोक्याला भीषण दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या अपघातानंतर डंपरचालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणाचा तपास सुरू असताना महिनाभरात दुसऱ्या एका सरपंचाचा मृत्यू झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पुढील तपास बीड पोलीस करीत आहेत. राखेचा टिप्पर पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

-----------

### जिजाऊंच्या जयघोषाने जन्मोत्सव

किरण राऊत, युवक अध्यक्ष संदीप खुटवड, जिल्हा संघटक गोपाळ इंगुळकर,लव्ही बुद्रुकचे सरपंच शंकरराव रेणूसे,सुरवडचे आदर्श सरपंच अशोक सरपाले,प्रकाश जेधे, बाबू गोरड, निलेश खामकर, नंदू रसाळ ,सुधीर रेणुसे, अजित पवार, संतोष डांगे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान राष्ट्रीय वेटलिप्टर खेळाडू अनुष्का लक्ष्मण करंजकर हिचा राष्ट्रीय खेळाडू तसेच कोल्हापूर येथील शिवकालीन मर्दानी आखाड्याचे अध्यक्ष गिरीश भैरु नार्वेकर यांचा राजगड भुषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन रोहित नलावडे, अविनाश रांजणे, रोहित महापुरे, संतोष गायखे,अमर रेणुसे, रामभाऊ राजिवडे, संतोष चोरघे, हनुमंत दिघे, पप्पु गुजर आदींनी केले.

----------

### २३ मार्चपासून आयपीएलचा धमाका

करण्यात आली. त्यासाठी मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीनंतर बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आयपीएल २०२५ विषयी महत्त्वाची माहिती दिली. येत्या २३ मार्च रोजीपासून आयपीएल चालू होईल असे शुक्ला यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

**२०२४ साली आयपीएल कधीपासून चालू झाला होता?**

गेल्या वर्षीदेखील आयपीएलचा थरार चांगलाच रंगला होता. २०२४ साली आयपीएलचे सामने २२ मार्च रोजी चालू झाले होते. या साली पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात रंगला होता. तर २६ मे रोजी या पर्वाचा अंतिम सामना खेळवला गेला होता. चेन्नईमधील एमए चिदंबरम स्टेडियमवर हा सामना झाला होता. २०२४ सालच्या आयपीएल ट्रॉफीवर कोलकाता नाईट रायडर्स या संघाने आपले नाव कोरले होते.

------------

### शरद पवार-उद्धव ठाकरे यांना

देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपाचे सर्व पदाधिकारी मंत्री उपस्थित होते. पुढे ते म्हणाले, एकनाथ शिंदे यांची शिवसेना हीच बाळासाहेबांची शिवसेना तर अजितदादांची राष्ट्रवादी खरी राष्ट्रवादी आहे. धोका देण्याची सुरुवात शरद पवारांनी तर शेवट उद्धव ठाकरेंनी केला. २०१९ ला उद्धव ठाकरे आमच्यासोबत गद्दारी केली. जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली विधानसभेला या मंडळींना घरी बसवण्याचे काम तुम्ही केले, असे शाह म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचे शाह यांनी कौतूक केले. देवेंद्र फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याचे स्वप्न पाहिले, कामही सुरू केले आता दुसऱ्या टर्ममध्ये मोदीजी आणि फडणवीस प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतावर पाणी पोहोचवणार आहेत. आता पुढील निवडणुकीत मते मागायला येण्यापूर्वी शेतात पाणी पोहोचवणार असल्याच्या विश्वासही त्यांनी बोलून दाखवला. भाजपच्या सदस्य नोंदणी अभियानासंदर्भात बोलताना त्यांनी येत्या दीड महिन्यात दीड कोटी सदस्य नोंदणीचे टार्गेट पूर्ण करा, अशा सूचना पदाधिकाऱ्यांना दिल्या. येत्या काही दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणूकीत विरोधक एकही जागा जिंकणार नाहीत याची काळजी तुम्ही घ्या. पंचायत ते संसद भाजपाच्या विजयाचे सूत्रधार बना असेही अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. लाडक्या बहिणी आणि शेतकऱ्यांना भाजपचे सदस्य बनवा, प्रत्येक निवडणूक भाजप जिंकेल हा संकलप साई बाबांच्या शिर्डीत करा, भविष्यात कुणी आपल्याशी विश्वासघात करणार नाही इतका मजबूत भाजप तयार करायचा आहे, असे ते म्हणाले.

------------

### नियमात न बसणाऱ्या लाडक्या

लाडक्या बहिणींना अर्पण, मात्र याच्यापुढे लोकांना सांगावे, जे नियमित नाही त्यांनी स्वतःहून नावे काढून घ्यावे. अन्यथा सरकारने दंडासह वसुली करावी, अशी प्रक्रिया राज्याचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे आमदार छगन भुजबळ यांनी बोलताना व्यक्त केली आहे.

------------

### सरकारच्या स्त्री केंद्रीत योजनांमुळे

नसावे. याव्यतिरिक्त, अहवालात निवडणूक आयोगाला वैयक्तिकरित्या मतदान करू न शकणाऱ्या नागरिकांमध्ये व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी व्यापक अनुपस्थित मतदान प्रणालींचा शोध घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

-------------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि.१३ जानेवारी २०२५



## भगवान प्राथमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

परळी : येथील संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था अंबाजोगाई संचलित भगवान प्राथमिक विद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती संयुक्तरित्या साजरी करण्यात आली. यावेळी या दोन्ही महाविभूतींच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यातआली.

छत्रपती शिवाजी महाराजांना घडवणाऱ्या आणि हिंदवी स्वराज्याच्या प्रेरक असणाऱ्या राजमाता जिजाऊ आणि युवकांनो झेप घ्या दिशा तुम्हाला शरण येतील हा प्रेरणादायी संदेश देणाऱ्या आणि युवकांची मूर्तीमंत प्रेरणा असणाऱ्या स्वामी विवेकानंद या दोन्ही महाविभूतींची जयंती आज भगवान प्राथमिक विद्यालयांमध्ये साजरी करण्यात आली.

यावेळी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक तथा मराठवाडा शिक्षक संघाचे नेते बंडू अघाव सर आणि कवी/ शाहीर अनंत मुंडे यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# शैक्षणिक साहित्यामुळे कृतीयुक्त शिक्षणास परिपूर्णता मिळते - केंद्रप्रमुख सुनिल मुंडे

**वडवणी । प्रतिनिधी**

शिक्षकांनी आपल्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना शैक्षणिक साहित्यांचा त्यात समावेश करावा. कृतीयुक्त अध्यापनाचा मुख्य गाभा असलेले शैक्षणिक साहित्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेला विकसित करण्यासाठी छान असे एक प्रकारचे शस्त्र असून याच शैक्षणिक साहित्यातून कृतीयुक्त शिक्षण दिल्यास त्यातून विद्यार्थ्यांना नवनिर्मितीची प्रेरणा मिळते तसेच त्यांची चिकीत्सक बुध्दिमत्ताही वाढीस लागते. तर शिक्षकांनाही दर्जेदार अध्यापनाची अनुभूती मिळते असे मनोगत चिंचवण केंद्राचे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर यांनी चिंचवण केंद्राच्या मासिक शिक्षण परिषदेत सोन्नाखोटा या ठिकाणी शिक्षकांना उदबोधन करतांना व्यक्त केले.



**सोन्नाखोटा येथे चिंचवण केंद्राची शिक्षण परिषद संपन्न**

वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राची ४ थी माहे जानेवारी महिन्याची मासिक शिक्षण परिषद चिंचवण केंद्रातील वडवणी तालुक्यातील गुणवत्तेची खाण असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा या डोंगरदऱ्यात वसलेल्या निसर्गरम्य ठिकाणी दि.११ जानेवारी २०२५ शनिवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी चिंचवण केंद्राचे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक सुनिल मुंडे सर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामभाऊ लांडे, सरपंच बिभीशन खोटे, बाजार समितीचे संचालक परसराम ताकपेरे, युवा नेते सतिश खोटे तसेच काही पालक व सर्व घटक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद बहूसंख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम शाळेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर या परिषदेसाठी सुलभक म्हणून लाभलेले नांदवटे सर यांनी अध्यापनाचे मासिक नियोजन, राठोड सर यांनी शाळेत पालकांचा लोकसहभाग, मुंडे सर यांनी अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा प्रभावी वापर, तांबोळी सर यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन अशा आपापल्या घटकांनुसार सर्वांना अत्यंत दर्जेदार व उपयुक्त असे सविस्तर मार्गदर्शन उपस्थित शिक्षक बांधवांना केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोरक्षनाथ मुंडे सर यांनी केले. प्रास्ताविक आश्रुबा मुंडे सर यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार ज्ञानेश्वर आळणे सर यांनी मानले. या मासिक शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा मुंडे सर, ज्ञानेश्वर आळणे सर, गोरक्षनाथ मुंडे सर, सुभाष चिकाळकर सर, नितीन बोखारे सर, राजीव बूच्छलवार सर, मीरा गायकवाड मॅडम, वत्सला गुरसाळी मॅडम, राजेश खोटे सर यांनी परिश्रम घेतले. अत्यंत उत्साही वातावरणात चिंचवण केंद्राची ही मासिक शिक्षण परिषद सोन्नाखोटा शाळेत संपन्न झाली.

## मोठेवाडीत राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवरायांना घडविणार्या थोर माता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि.१२ जानेवारी रविवार रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः राजमाता मॉ. जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच अविनाश गोंडे हे होते तर ग्रामसेवक बिभीषण डोरले, तुकाराम पास्टे,संभाजी पास्टे, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ खेत्री,उपसरपंच अंगदराव खेत्री, पांडुरंग गोंडे, सुदर्शन हिवरकर,राहुल सुरवसे, गजानन गोंडे, कचरू नावडकर, बाबासाहेब, संजय रोकडे,परमेश्वर खेत्री, अंगणवाडी ताई पंचफुला पास्टे, शंकुतला गिराम,शिवकन्या खेत्री, आशामती चव्हाण,यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या जिवन कार्यावर संभाजी पास्टे यांनी प्रकाश टाकला तर आभार गणेश सर्जे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश शेळके, गणेश पास्टे, प्रदीप खेत्री यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### माजलगाव एमआयडीसीमध्ये

प्लॉट धारकांना जनरल झोनचा परवाना देण्यात यावा, निशुल्क मुदत वाढ देऊन उद्योजकांना उभारणीसाठी दिलासा द्यावा अशी मागणी प्रादेशिक अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माजलगाव येथील सर्व प्लॉट धारकांनी निवेदनाव्दारे केली आहे.

### आष्टा हरीनारयण येथे

आवाहन विद्यार्थ्यांना केले. श्री. सचिन निकाळजे यांनी सोबत आणलेल्या निवडक पुस्तकांचे वाटप करून आपसांत आदानप्रदान करण्याचे व सुस्थितीत परत करण्याचे सूचित केले. पुस्तक अवलोकन आणि परीक्षण या विषयावर समूह चर्चा झाली. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. जगताप सर यांनी वाचन लेखन वाढविण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. श्री. उमेश झांबरे सरांनी आभार प्रदर्शन केले.

### जैन युवाचार्य महेंद्रऋषिजी

महेंद्रऋषिजी महाराज साहब यांच्या आगमनामुळे व संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त श्री अमोलक जैन विदया प्रसारक मंडळ जुन २०२५ पासुन इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेली कम्युनिकेशन इंजिनिअरिंग, इनफॉरमिशन टेक्नॉलॉजी आणि आर्टीफिशियल इंटलिजिंन्स ॲण्ड डाटा सायन्स हे अभ्यासक्रम सुरु करण्याचा संस्थेने शुभ संकल्प केला आहे. तसेच बॉइज ॲण्ड गर्ल्स होस्टेल व इंग्लिश मेडियमसाठी नविन इमारत बांधण्याचाही शुभसंकल्प प.पू. गुरुवर्याच्या उपस्थितीत होणार आहे. मकर संक्रातीच्या शुभदिनी त्यांचे मार्गदर्शन व मंगलाचरणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री अमोलक जैन विदया प्रसारक मंडळ व श्री वर्धमान जैन श्रावक संघ यांच्या संयुक्त विदयमानाने करण्यात आलेले आहे.

प.पू. महेंद्रऋषीजी म.सा. यापूर्वी १९९४ मध्ये प.पू. श्री आदर्शऋषीजी म.सा. यांच्या समवेत चातुर्मास निमित्त कडा येथे वास्तवास होते. त्यानंतर २००८ मध्ये ही त्यांच्या वास्तव्याचा लाभ मिळाला , आता पुन्हा एकदा त्यांच्या वास्तव्याचा योग आला आहे.

### फुलसांगवी येथे सप्ताहाची

गावकरी सप्ताहाची पूर्वतयारी करत आहेत. मंदिर परिसर साफसफाई करणे, पाण्याची व्यवस्था करणे लाईटची व्यवस्था करणे, स्वयंपाक ग्रहाची साफसफाई सह येथे चालू राहणाऱ्या अन्नछत्राची सर्व तयारी गावकरी करत आहेत. या ठिकाणी पंचक्रोशीतील ५० हून अधिक गावाच्या सहकार्यातून अखंडपणे अन्नछत्र चालू राहत असल्यामुळे का चुलांगणाला लागणारे सरपणासह, किराणा सामान भाजी तरकारी आदींची खरेदी करून सर्व प्रकारचे व्यवस्थापन चालू आहे. तर इकडे मंडप डेकोरेशन उभारणीचेही काम जोमात चालू आहे. या सप्ताहास मध्ये येणाऱ्या भाविक भक्तांना ज्ञानअमृताचे प्रबोधन व्हावे यासाठी प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्रभरातील नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर हभप महंत रामेश्वर महाराज शास्त्री (ब्रम्हनाथ संस्थान येळंब ) यांच्या श्रीमद्? भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यासह संगीत भजन, काकडा भजन, श्रीमद्भगवद्गीता विष्णुसहस्रनाम, तुकाराम महाराज गाथा भजन, हरिपाठ आधी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. त्याचबरोबर या ठिकाणी आरोग्य शिबिर,रक्तदान शिबिर, पार पडणार आहे यामुळे या कार्यक्रमाचा नावलौकिक या धार्मिक कार्यक्रमाला सामाजिक कार्याची झालर लागून कार्यक्रमाची व्यापकता वाढणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी फुलसांगवी येथील अखंड हरिनाम सप्ताह उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



**बीड : शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सकाळी मॉंसाहेब जिजाऊ उद्यान,राजीव गांधी चौक,बीड येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यास उपस्थित राहुन मॉंसाहेब जिजाऊंना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शिवसंग्राम भवन, नगर रोड बीड येथे मॉ जिजाऊंना अभिवादन करण्यात आले, याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.**

## वानोळे यांना शिक्षक पुरस्कार

**मंठा । प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथे प्राथमिक शिक्षक पदावर कार्यरत गंगाधर यशवंत वानोळे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल बीड जिल्ह्यातील मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शिक्षक वानोळे हे जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासून स्पर्धा परीक्षेची आवाड निर्माण होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. तसेच वरिष्ठ अधिकारी व पालकांचा विश्वास संपादन करून वानोळे यांनी स्वखर्चातून वर्ग सजावट केलेली आहे. विद्यार्थ्यांप्रती नेहमी जागरूक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते सातत्याने नवनवीन उपक्रम राबवित असतात.



हभप.मोहन महाराज खरमाटे यांच्या अध्यक्षतेखाली १२ जानेवारी,२०२५ रोजी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात पुरस्कार वितरण सोहळा घेण्यात आला. सुप्रसिद्ध कीर्तनकार महंत हभप.राधाताई सानप महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी माजी आमदार ॲड.उषाताई दराडे, सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, प्राचार्य डी.जी.तांदळे, उद्योजक इंजि.उत्तमराव मिसाळ, संपादक प्रा. ज्ञानेश्वर वाघ, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, पांडुरंग जायभाये आदींची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळयात वानोळे यांच्यासह अन्य शिक्षकांना गौरविण्यात आले. रामदास हांगे, रामदास आमले, सुभाष वानोळे,गंगाधर डवरे यांच्यासह असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

# नागापूर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नागापूर खुर्द येथे दिनांक ७ जानेवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताह सुरू झाली. या हरिनाम सप्ताहाची समाप्ती १४ जानेवारी रोजी ह भ प ज्ञानेश्वर महाराज टेकाळे यांच्या काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे बीड तालुक्यातील नागपूर खुर्द येथे संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त सात दिवस श्रीमद्? भागवत कथा ज्ञान यज्ञ व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होतो .दिनांक ७जानेवारी रोजी ह. भ. प. प्रसाद महाराज जवरे यांच्या कीर्तनाने या सप्ताहाची सुरुवात झाली. त्यानंतर ८ जानेवारी रोजी संदेश महाराज घिगे ९ जानेवारी रोजी आदिनाथ महाराज डोळे तर शुक्रवारी दिनांक १० जानेवारी रोजी भगवानगडाचे उत्तराधिकारी ह. भ. प.कृष्णा महाराज शास्त्री यांचे कीर्तन झाले. शनिवार दिनांक ११ जानेवारी रोजी रामदास महाराज दराडे ,रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी केशव महाराज भगत यांचे कीर्तन झाले. तर आज ह.भ.प. संतोष महाराज गीते यांचे कीर्तन होणार असून मंगळवारी ज्ञानेश्वर महाराज टेकाळे यांचे काल्याचे कीर्तनाने आणि महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहाचा भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन नागापूर खुर्द येथील ग्रामस्थांनी केले आहे.



**कृष्णा महाराजांचे जोरदार स्वागत**

भगवान गडाचे उत्तराधिकारी ह .भ. प .कृष्णा महाराज शास्त्री यांचे नागापूर येथे आगमन होताच त्यांचे रथातून मिरवणूक काढून ढोल ताशाच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. या स्वागताने कृष्णा महाराज शास्त्री भारावून गेले.

# शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या तिसऱ्या तालुकास्तरीय सामान्यज्ञान परीक्षेचे १९ जानेवारीला आयोजन

### तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा व शालेय विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान परीक्षेत सहभाग घ्यावा - विजय रापतवार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद या थोर महान विभूतींच्या जयंतीनिमित्त यांच्या जीवन कार्यावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार व सचिव विष्णू सरवदे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील खाजगी शाळासाहित जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील या सामान ज्ञान परीक्षेत सहभाग घेण्याचे आवाहन शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

सदरील सामान्य ज्ञान परीक्षा ही ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी या दोन गटात होणार असून यामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात रोख रक्कम व सन्मानचिन्ह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वितरित करण्यात येणार आहेत. सध्याचा काळ हा स्पर्धेचा काळ आहे , प्रत्येक क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली असून या स्पर्धेत आपला किंवा आपल्या शाळेतील विद्यार्थी टिकावा यासाठी ही सामान्य ज्ञान परीक्षा उपयुक्त ठरणार असणार असल्याचे शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण च्या वतीने अधोरेखित करण्यात आले आहे.



ग्रामीण भागातील तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी आहे प्रकारच्या स्पर्धा परीक्षा पासून वंचित असतात . पण शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या संपूर्ण टीमने ही बाब हेरून खाजगी संस्थांच्या शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना अशी स्पर्धा परीक्षा अवगत व्हावी तसेच इथला विद्यार्थी देखील कोणत्याही स्पर्धेसाठी तयार व्हावा या उद्देशाने अंबाजोगाई तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांसाहित खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे . शहरातील विद्याथी हा संपूर्ण पणे त्याला सर्व सोयी सुविधा उपलब्ध झाल्याने तो अशा स्पर्धा परीक्षेत पारंगत होतो . मात्र ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा व शाळेतील विद्यार्थी यांना शाळेत पाहिजे तशा सुविधा उपलब्ध होत नाहीत त्यामुळे येथील विद्यार्थी हा काही अंशी पाठीमागे रहातो त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांना देखील मोठया प्रमाणावर या स्पर्धेत सहभागी करून घेण्याचे प्रतिष्ठाणच्या वतीने ठरविण्यात आले आहे.

सदरील परीक्षा ही दोन गटांमध्ये होणार असून त्यामध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी लहान गट व इयत्ता ८ वी ते १० वी मोठा गट असे करण्यात आले आहेत. या दोन्ही गटामधून परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १५०१/- रुपये रोख व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास १००१/- रुपये रोख, व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास ७०१/- रुपये व सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सामान्य ज्ञान ही परीक्षा रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा अंबाजोगाई शहरातील बस स्थानकाच्या पाठीमागे असलेल्या संकल्प विद्या मंदिर या ठिकाणी संपन्न होणार आहे .अशा प्रकारच्या सामान्य ज्ञान परीक्षेमुळे शालेय विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडून त्यांना स्पर्धा परीक्षेचा सराव होण्यास मदत मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना यापुढील काळातील त्यांच्या उज्वलव वाटचालीसाठी खूप मोठा फायदा झाल्याचे पहावयास मिळनार आहे. तेव्हा सदरील स्पर्धेमध्ये अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त शाळांनी आपापल्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवावा असे आवाहन शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांच्यासह उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे, सचिव विष्णू सरवदे , सहसचिव शेख इरफान , कोषाध्यक्ष साधू गायकवाड, सल्लागार दत्ता देवकते,उमेश नाईक, सदस्य अनुरथ बांडे , बाळासाहेब माने , सुनील पवार , शेख आरिफ, शेख इरफान, उत्तरेश्वर मिटकरी, महेश वेदपाठक, संदीप दरवेशवार, समाधान धिवार, अशोक पोपळघट, गणेश तौर,श्रीनिवास मोरे रत्नाकर निकम, राजीव पटेल,श्रीधर देशपांडे, संत कराड, बालाजी जाधव,बालाजी टिळे, महेश पवार, मोरोपंत कुलकर्णी , आत्माराम बनसोडे ,जगन्नाथ वरपे आदींनी केले आहे.


## नगरपंचायत कार्यालय, तीर्थपुरी

प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी

Email : nptirthpuri2021@gmail.com

जा.क्र/नपमं/स्वच्छता. वि / /२०२५ दिनांकः ०१.२०२५

### जाहीर आवाहन

संदर्भ :- नगरविकास शासन निर्णय क्रमांक याचिका ३०१७ प्र.क्र १३०/नवि-२२ दिनांक. १४. नोव्हेंबर २०२२ तीर्थपुरी नगरपंचायत क्षेत्रामध्ये होल्डिंग फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी बाबत SOP (Standard operating Procedure) खालील प्रमाणे

| अ.क्र | होल्डिंग फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी निश्चित केकेल्या जागा | |
|---|---|---|
| ०१ | आण्णाभाऊ साठे चौक घनसावंगी रोड तीर्थपुरी | |
| ०२ | नवीन बसस्थानक तीर्थपुरी | |
| ०३ | नगरपंचायत कॉम्प्लेक्स बालाजी मेडीकल परिसर तीर्थपुरी | |
| ०४ | अंबड रोड कॉनॉल परिसर तीर्थपुरी | |
| ०५ | शासकीय दर | २ रु प्रती Sq Feet प्रति दिन |
| ०६ | परवानगीसाठी अर्ज करण्यासाठी Website | https://mahaulb.in./MahaUlB/index |
| ०७ | अनधिकृत बॅनर्स तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक/मेल आय डी | nptirthpuri2021@gmail.com |
| ०८ | Strucatural Audit Report | सर्व शासकीय व सामाजिक तसेच वयक्तिक संस्थानी आपल्या परिसरातील होल्डिंग फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी उभारलेल्या मोठ्या लोखंडी फ्रेम (stracture) याचे दरवर्षी ३१ मार्च पर्यंत Strucatural Audit करून Strucatural Audit Report या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. |
| ०९ | नोडल ऑफिसरचे नाव | व्ही. व्ही. सोनखेड़कर ८६६९०१५६१४ |
| १० | वार्ड अधिकारी | बजरंग घुलेकर ९९२२२६३७९५ |
| ११ | तीर्थपुरी नगर पंचायत वार्ड कामकाज समिती | १) व्ही. व्ही. सोनखेडकर ८६६९०१५६१४ (नोडल ऑफिसर)<br>२) बजरंग घुलेकर ९९२२२६३७९५ (वार्ड अधिकारी)<br>३) जितेंद्र गाडेकर ९२२६८३७७७० (सदस्य)<br>४) सोपान कडुकर ९४२३८४४८८२ (सदस्य)<br>५) संतोष लवनाडे-९४०३१५३००७ (सदस्य) |

वरील ठिकाणी नगरपंचायतचे परवानगी घेऊनच होल्डिंग, फ्लेक्स, बॅनर्स व पोस्टर्स लावण्यात यावे. जर उपरोक्त जाहीर केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी विना-परवानगी होल्डिंग, फ्लेक्स, बॅनर्स व पोस्टर्स लावल्यास संबंधिता विरुध्द मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र १५५/२०११ च्या आदेशान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरित

**मुख्याधिकारी**

नगर पंचायत तीर्थपुरी


cmyk

# शेतकरी ते ग्राहक थेट शेतीमाल विक्रीला प्रतिसाद

## संभाजीनगरमध्ये राबविलेल्या कार्यक्रमाला गर्दी



**संभाजीगर । प्रतिनिधी**

**कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) आणि ॲग्रो यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित कृषी व धान्य महोत्सवातील दालनावरुन शेतीमालाची शेतकरी ते ग्राहक अशी थेट शेतमाल विक्री होत आहे. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या दर्जेदार शेतीमाल खरेदीसाठी ग्राहकांची सर्वाधिक पसंती आहे.**

कृषी प्रदर्शनात छत्रपती संभाजीनगर जिल्हा कृषी व धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शेतकरी उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया सूक्ष्मउद्योग अंतर्गत वैयक्तिक लाभार्थी आदीचे स्टॉल्स आहेत. या महोत्सवामध्ये ज्वारी, बाजरी, मूग, उडीद, मटकी, जवस, कुळीथ अशा विविध प्रकारच्या डाळी, आवळा, अंबाडी, सरबत, हळकुंड, हळद पावडर, रोस्टेड सोयाबीन, तसेच करडी पेंड, करडई, शेंगातेल आदी प्रक्रिया उत्पादनांची विक्री होत आहे. आत्माच्या दालनावर शेतकऱ्यांनी पिकविलेल्या दर्जेदार ब्रोकोली, टोमॅटो आदी भाजीपाला, केळी, कवठ, मोसंबी फळे मांडण्यात आली आहेत. या धान्य महोत्सवाच्या पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी उच्चप्रतीचे धान्य, प्रक्रिया उत्पादनाच्या खरेदीसाठी शहरी तसेच ग्रामीण भागातील ग्राहकांची झुंबड उडाली. शेतकरी गटाच्या स्टॉलवर मध तर बळीराजा गटाने काळ्या मनुका, अंजीर, काजू, आक्रोड, खजूर या सुका मेव्यासह आंबा बर्फीचे दालन थाटले आहे. ताडहादगाव येथील बचत गटाच्या दालनावरील मेंढी लोकर पासून बनविलेल्या काळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या घोंगड्या, आसन पट्ट्या, उश्या आदींचा समावेश आहे. त्याच्या खरेदीकडेही ग्राहकांचा कल आहे. याबाबत बिडकीन येथील कृषी समर्पण फार्मर प्रोड्युसर्स कंपनीचे प्रल्हाद बोडखे म्हणाले, गूळ, गूळ मलाई, विविध फ्लेवरचे गूळ क्यूब, काकवी आदीची चांगली विक्री सुरु आहे, असे त्यांनी सांगितले. तर कुंभेफळ येथील जय जवान शेतकरी गटाचे अनिल शेळके यांनी दूध, दही, श्रीखंड, लस्सी, तूप, कुल्फी आदी उत्पादनास ग्राहकांची पसंती असल्याचे सांगितले.

### शून्य मशागत तंत्र दालनात रेलचेल

शून्य मशागत शेती तंत्र तसेच जैविक शेतीबद्दल शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणारी दालने ही या महोत्सवाचे वैशिष्टय ठरली आहे. या दालनात शेतकरी आवर्जून थांबून शून्य मशागत शेती तंत्रासह जैविक शेतीबाबत माहिती घेत आहेत. दिवसभर शेतकऱ्यांची या दालनामध्ये रेलचेल दिसत आहे.

# सिमला मिरचीवरील रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय



**आहारामध्ये भाजीपाल्याला खूप महत्व आहे. कारण यामध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह यांसारखी खनिजद्रव्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. तसेच अ आणि क जीवनसत्वेदेखील मोठया प्रमाणात असते. साहजिकच भाजीपाल्याचे महत्व वाढले असल्याने शेतकरीवर्ग भाजीपाला लागवडीकडे वळू लागला आहे. यामध्ये अनेकजण सिमला मिरचीचे उत्पादन घेतात. सिमला मिरची आरोग्याच्या दृष्टीने खूप फायदेशीर असते. घरामध्ये तयार केलेली भाजी असो किंवा रेस्टॉरंटमध्ये बनवलेले चायनीज असो, प्रत्येक पदार्थाची चव वाढवण्याचे काम सिमला मिरची करत असते. त्यामुळे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारापेठांमध्ये सिमला मिरचीची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. या मिरचीची अनेक शेतकरी लागवड करतात. या पिकावर विविध रोग पडतात त्याचा अभ्यास केल्यास यावर चांगले नियंत्रण मिळविता येते.**

सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असणारे लहान लहान ठिपके पाहायला मिळतात. कालांतराने ते तपकिरी किंवा काळे होत जातात. हा रोग टाळण्यासाठी तुम्ही प्रतिकारक वाणांचा वापर करणे गरजेचे आहे. इतकेच नाही तर जमिनीमध्ये रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत राहणे गरजेचे आहे. तसेच पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नये. कारण असे झाले तर देठ आणि फळांवर खोल जखम पाहायला मिळत असून यामुळे पाने कोमेजून कुजण्याची शक्यता असते. पानांवर जास्त पाणी आणि सिंचन टाळावे. त्याशिवाय रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाकावी ज्यात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशकाचा वापर करावा. पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके पाहायला मिळतात. हा रोग टाळायचा असेल तर हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवणे गरजेचे आहे. प्रतिबंधात्मक उपायासाठी सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरणे गरजेचे आहे. त्याशिवाय सिमला मिरचीची पाने पिवळी पडून कोमेजतात. तर अनेकदा ही पाने पूर्णपणे कोमेजून जातात. जर तुम्हाला हे टाळायचे असेल तर रोगमुक्त बियाणे आणि रोपांचा वापर करावा. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत सिमला मिरचीची लागवड करावी. महत्त्वाचे म्हणजे या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नसल्याने प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष द्यावे. जर तुम्हीही सिमला मिरचीची लागवड करत असताना या गोष्टींचा विचार केला तर तुम्हाला भरघोस उत्पन्न मिळेल.

# पांढऱ्या कांद्याच्या लागवडीतून शेतकऱ्यांना मिळतो भरघोस नफा



कांद्याचा वापर सर्व घरांमध्ये केला जातो. कांद्याचा वापर सर्व भाज्यांमध्ये केला जातो. तो सॅलडमध्येही खाल्ला जातो. असे बरेच लोक आहेत ज्यांना कांद्याची चव आवडते पण कांद्याचा तिखटपणा कमी असावा असे वाटते. पांढरे कांदे सामान्य कांद्यासारखे दिसतात पण रंगाने पांढरे असतात. त्यांची चव लाल किंवा पिवळ्या कांद्यापेक्षा कमी तिखट आणि सौम्य गोड असते. तसेच ते कापताना लाल कांद्यापेक्षा डोळ्यांना कमी पाणी येते.

बरेच शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करून चांगले पैसे कमवत आहेत. या कांद्याला जास्त मागणी बाजारामध्ये असते. त्यामुळे याला दर देखील चांगला मिळतो. त्यामुळे अनेकजण याची लागवड करत असल्याचे दिसते. देशात पांढऱ्या कांद्याची लागवड मुख्यतः महाराष्ट्र, गुजरात, ओडिशा, राजस्थान, तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये केली जाते.

**शेती पद्धत :**

याची लागवड खरेदी आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात करता येते, त्याचे पीक सुमारे १०० ते १२० दिवसांत तयार होते. त्याचे सरासरी उत्पादन प्रति हेक्टरी ३० ते ४० टन असते. ते ३ महिने साठवले जाते. त्याच्या लागवडीसाठी सर्वात अनुकूल तापमान २० ते २० पर्यंत असते. ते २५. ६० ते ६.८ असलेली माती पांढऱ्या कांद्याच्या लागवडीसाठी सर्वात योग्य मानली जाते. जमिनीत पाण्याचा निचरा चांगला असावा, पाणी साचलेल्या जमिनीत कांद्याची वाढ चांगली होत नाही. पांढऱ्या कांद्याची लागवड करताना लक्षात ठेवण्याची आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक रोप दुसऱ्यापासून पुरेशा अंतरावर असले पाहिजे. त्यांना एकमेकांपासून सहा इंच अंतरावर लावण्याची शिफारस केली जाते. तुम्ही तुमचा कांदा ओळीत लावत असाल तर तुम्हाला तसेच ओळींमध्ये योग्य अंतर ठेवावे.पांढऱ्या कांद्याच्या ओळींमध्ये बारा इंच अंतर ठेवावे. असे केल्यास तुमच्या उत्पादनात देखील चांगली वाढ होईल आणि तुम्हाला चांगला नफा मिळेल.

# फ्लावरच्या या दोन जाती देतील भारघोस उत्पन्न



**आपल्या देशात बहुतांश शेतकरी भाजीपाला पिकवतात, अशा परिस्थितीत भाजीपाल्यातून शेतकरी भरपूर कमाई करतात, त्यापैकी फ्लावर हेही महत्त्वाचे पीक आहे.फ्लावर हे सामान्यत: हिवाळ्याच्या हंगामात घेतले जाते, परंतु आजकाल त्याच्या काही प्रगत जाती आल्या आहेत, ज्या कोणत्याही हंगामात घेता येतात. फ्लावर हे क्षेत्र आणि उत्पादनाच्या दृष्टीने पंजाबमधील तिसरे महत्त्वाचे पीक आहे. फ्लावरची लागवड मुख्यत्वे हिवाळ्यात केली जाते, परंतु योग्य प्रकारची निवड करून ते जवळजवळ वर्षभर घेतले जाऊ शकते. शेंगा तयार झाल्यावर तापमान २३ आणि फुले तयार झाल्यावर १७-२० असावे. फ्लावर सर्व प्रकारच्या जमिनीत पेरता येते, परंतु ते वालुकामय आणि चिकणमाती जमिनीत चांगले वाढते.**

**फ्लावरच्या जाती :**

मिळालेल्या माहितीनुसार, फ्लावरची लागवड करताना त्याची फुले लहान येऊ नयेत म्हणून योग्य वाण निवडणे अत्यंत आवश्यक आहे. पंजाब कृषी विद्यापीठाने पुसा स्नोबॉल-१ आणि पुसा स्नोबॉल के-१ या फ्लावरच्या दोन जाती शोधून काढल्या आहेत, जे जास्त उत्पादन देतात.

**फ्लावरसाठी पाणी आणि तण नियंत्रण कसे करावे?**

फ्लावरचे पीक शेतात बुजवल्यानंतर लगेचच पहिले पाणी दिले जाते. यानंतर जमिनीचा प्रकार आणि हवामानानुसार उन्हाळ्यात ७-८ दिवस आणि हिवाळ्यात १०-१५ दिवसांच्या अंतराने पाणी देता येते. संपूर्ण पिकाच्या दरम्यान सुमारे ८ ते १० वेळा पाणी द्यावे. चांगल्या पिकासाठी तणमुक्त असणे आवश्यक आहे, त्यासाठी वेळोवेळी तण काढणे आवश्यक आहे.

**फ्लावरची काढणी कधी करावी**

जेव्हा फुले विक्रीयोग्य आकाराची असतात तेव्हा ती कापून टाकावीत. काढण्यास उशीर झाल्यास फुलांचे विघटन होऊन त्यांची विक्री होऊ शकत नाही. मार्केटिंग बास्केटमध्ये ठेवा. याद्वारे शेतकरी कोबीच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकतात. जर तुम्हाला याची लागवड करायची असेल तर आधी कृषी विभागाचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

**खते व पाणी व्यवस्थापन :**

कोबी पिकास लागवडीपूर्व ८० किलो नत्र ८० किलो स्फूरद व ८० किलो पालाश द्यावो व लागवडीनंतर १ महिन्याने ८० किलोचा नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. तसेच फुलकोबीसाठी ७५ किलो नत्र ७५ किलो स्फूरद आणि ७५ किलो पालाश द्यावे. लागवडीनंतर १ महिन्याने ७५ किलो नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. लागवडीनंतर तिसऱ्या दिवशी आाणि नंतर पुरेसा ओलावा राहील. अशा अंतराने जमिनीचा मगदूर पाहून पाण्याचा पाळया द्याव्यात. कोबी व फूलकोबीचे गडडे निघू लागल्यापासून गडडयांची वाढ होईपर्यंत भरपूर पाणी द्यावे व नंतर हलकेसे पाणी द्यावे.

**आंतरमशागत :**

शेत २ ते ३ खुरपण्या देऊन तणविरहीत करावे. खुरपणी करताना रोपांच्या बुंध्याशी मातीचा आधार द्यावा म्हणजे रोपे कोलमडत नाही व रोपांची वाढ चांगली होते. फूलकोबीच्या गडडयांची पांढरी शुभ्र प्रतीक्षा तयार होण्याकरिता गडडे काढणीपूर्वी १ आठवडाभर गडडयाच्या आतील पानांची झाकून घ्यावे. त्यामुळे सूर्यप्रकाशामुळे होणारी हानी टाळली जाते.

**किड व रोग :**

कोबीवर्गीय भाज्यांना मावा तुडतुडे फूलकिडे कोबीवरील अळी कॅबेज बटर फलाय असे विविध किडींचा तसेच ब्लॅक लेग, क्लब रूट, घाण्या रोग, रोपे कोलमडणे, लिफ स्पॉट या रोगांचा प्रादुर्भाव होतो. किडींच्या बदोबस्तासाठी रोपवाटीकेतील रोपांपासून ते लागण झालेल्या भाज्यांवर एन्डोसल्फान ३५ सीसी २९० मिली किंवा फॉस्फोमिडॉन ८५ डब्ल्यू एस सी ६० मिली किंवा मॅलेथिऑन ५० सीसी २५० मिली २५० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारावे. किडी व रोगाचे एकत्रितरित्या नियंत्रण करण्यासाठी मॅलॅथिऑन ५० सीसी ५०० मिली अधिक कॉपर ऑक्झक्लोराईड ५० डब्ल्यूपी १०५० ग्रॅम्? किंवा डायथेम एम ४५, ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. वरील किटक नाशकांच्या २ ते ३ फवारण्या १० ते १२ दिवसांच्या अंतराने कराव्यात.

**काढणी व उत्पादन :**

जातीपरत्वे कोबी ण२५ ते ३ महिन्यात तयार होतो. तयार गडडा हातास टणक लागतो. तयार गडडा जादा काळ तसाच ठेवला तर पाणी दिल्यावर तो फूटून नुकसान होण्याचा संभव असतो. म्हणून तो वेळीच काढून घ्यावा. फूलकोबी चा गडडा पिवळसर पडण्यापूर्वी काढावा. कोबीचे २०० ते २५० क्विंटल तर फूलकोबीचे १०० ते २०० क्विंटल हेक्टरी उत्पादन घेता येते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### राष्ट्रीय युवा दिवस

### महत्वाच्या घटना

१६१० : गॅलिलियो यांनी गुरूचा चौथा उपग्रह कॅलीस्टोचा शोध लावला.
१८८९ : नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल यांनी लिहिलेल्या शारदा नाटकाचा पहिला प्रयोग इंदूर येथे झाला.
१८९९ : गोविन्द बल्लाळ देवल यांच्या 'संगीत शारदा' या नाटकाचा पहिला प्रयोग इंदूर येथे झाला.
१९१५ : इटलीतील अवेझानो येथे भूकंप. २९८०० लोकांचे निधन.
१९१० : न्यूयार्क मध्ये पहिल्यांदा सार्वजनिक रेडीओ च्या माध्यमातून प्रसारण.
१९३० : मिकी माऊसची चित्रकथा प्रथम प्रकाशित.
१९४८ : १२ जानेवारीच्या संध्याकाळीमहात्मा गांधींनीहिंदू मुस्लीम एकतेसाठी उपोषणाला बसण्याचे घोषित केले आणि आजच्या दिवशी ते उपोषणाला बसले.
१९५३ : मार्शल टिटो युगोस्लाव्हियाच्या अध्यक्षपदी
१९५७ : हिराकूड धरणाचे पंडित नेहरूंच्या हस्ते उद्घाटन झाले.
१९६४ : कोलकता येथे झालेल्या मुस्लिमविरोधी दंग्यात १०० जण ठार
१९६७ : पुण्यातील स.प. महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न.
१९७८ : अमेरिकेने पहिल्यांदा महिला अंतरिक्षयात्री निवडली.
१९९६ : पुणे मुंबई दरम्यान 'शताब्दी एक्सप्रेस' सुरू झाली.
२००७ : के. जी. बालकृष्णन यांनी भारताचे ३७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२००९ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला नॅशनल कांफ्रेंस चे अध्यक्ष बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९१९ : एम. चेन्ना रेड्डी आंध्र प्रदेशचे ११ वे मुख्यमंत्री, उत्तर प्रदेशचे राज्यपाल (१९७४ १९७७), पंजाबचे राज्यपाल (१९८२ १९८३), राजस्थानचे राज्यपाल (१९९२ १९९३), तामिळनाडूचे राज्यपाल (१९९३ १९९६) (मृत्यू: २ डिसेंबर १९९६)
१९२६ : शक्ती सामंत हिन्दी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक व निर्माते (मृत्यू: ९ एप्रिल २००९)
१९३८ : पं. शिवकुमार शर्मा प्रसिद्ध संतूरवादक व संगीतकार
१९४९ : राकेश शर्मा एकूण १३८ वा व पहिला भारतीय अंतराळवीर
१९७८ : भारतीय अभिनेता अस्मित पटेल यांचा जन्म.
१९८२ : कमरान अकमल पाकिस्तानी क्रिकेटपटू
१९८३ : इम्रान खान भारतीय चित्रपट कलाकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३२ : थॉमस लॉर्ड लॉर्डस क्रिकेट ग्राउंडचे संस्थापक (जन्म: २३ नोव्हेंबर १७५५)
१९७६ : अहमद जाँ थिरकवा सुप्रसिद्ध तबला वादक (जन्म: ? ? १८९२?)
१९८५ : मदन पुरी हिन्दी व पंजाबी चित्रपटांतील चरित्र अभिनेता (जन्म: ? ? १९१५)
१९९७ : मल्हार सदाशिव तथा 'बाबूराव' पारखे उद्योजक व वेदाभ्यासक (जन्म: १५ एप्रिल १९१२)
१९९८ : शंभू सेन संगीत दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक
२००१ : श्रीधर गणेश दाढे संस्कृत पंडित व लेखक. कालिदासाचे 'मेघदूत' कवींद्र परमानंद यांचे 'शिवभारत' यांचे पद्यमय अनुवाद त्यांनी केले आहेत.
२०११ : प्रभाकर पणशीकर ख्यातनाम अभिनेते (जन्म: १४ मार्च १९३१)
२०१३ : रुसी सुरती क्रिकेटपटू (जन्म: २५ मे १९३६)

# जगातील सर्वात मोठ्या सोयाबीन उत्पादक देशाचे उत्पादन घटणार



**यंदाच्या हंगामात ब्राझीलमध्ये सोयाबीन उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. ब्राझीलमध्ये २०२३-२४ मध्ये सोयाबीन उत्पादनात १५८.५ दशलक्ष टनाने खाली येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०२२-२३ ऑक्टोबरमध्ये हा अंदाज १६१ दशलक्ष टन होता. त्यावर्षी हा अंदाज चालू हंगामाच्या ३ दशलक्ष टनाने जास्त होता, असं एफएएसने () ने त्यांच्या अहवालात म्हटलं आहे. तसंच ब्राझीलची अन्न एजन्सी कोनाबने देखील बुधवारी प्रकाशित केलेल्या मासिक अपडेटमध्ये आपल्या सोयाबीन उत्पादन घटीचा अंदाज व्यक्त केला आहे.**

''उष्ण आणि कोरडे हवामान, जमिनीतील कमी ओलावा पातळी तसेच ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये झालेला सरासरीपेक्षा कमी पाऊस यामुळे सोयाबीन उत्पन्नावर यंदा परिणाम झाला आहे. देशातील प्रमुख सोयाबीन उत्पादक प्रदेशांपैकी एक असलेल्या रिओ ग्रांदे डो सुलमध्ये गेल्या दोन महिन्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे लागवडीचा वेग मंदावला. ज्यामुळे नुकत्याच लागवड केलेल्या बियांची योग्य वाढ झाली नाही, आणि पिकाला धोका निर्माण झाला'', असं वृत्तही एका इंग्रजी वृत्तसंस्थेने दिले आहे.ऑक्टोबरच्या अंदाजानुसार पेरणी क्षेत्रात २ लाख हेक्टरची घट झाल्याचा अंदाज असूनही एफएएसने २०२२-२३ मध्ये सोयाबीनचे क्षेत्र ३ टक्क्यांनी वाढून ४४ दशलक्ष हेक्टरवर जाण्याचा अंदाज लावला आहे.

ब्राझील हा जगातील सर्वात मोठा सोयाबीन उत्पादक आणि निर्यातदार देश आहे. मागील काही वर्षापासून हा देश उत्पादन आणि निर्यातीमध्ये युनायटेड स्टेट्सला मागे टाकत आहे. २०२३-२४ मध्ये ब्राझीलची युनायटेड स्टेटच्या तुलनेत एकूण निर्यात दुप्पट होण्याचा अंदाज आहे. तर सर्वात जास्त निर्यातही चीनला जाते तसेच चीन मोठा आयातदार देश आहे. सोयाबीनचे उत्पादन कुठे कुठे होते. जगात सर्वात जास्त सोयाबीनचे उत्पादन ब्राझीलमध्ये होते. त्यानंतर युनाटेट स्टेट, अर्जेटिना, चीन, भारत, पॅराग्वे, कॅनडा, रशिया, युक्रेन,बोलिव्हिया या १० देशात सोयाबीनचे उत्पादन घेतले जाते. टॉप १० हे सोयाबीन उत्पादक देश म्हणून ओळखले जातात.

# जग विध्वंसाला वैतागले, शांतीची अपेक्षा करतेय - प्रकाश पाठक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प गुंफताना व्याख्याते प्रकाश पाठक (सनदी लेखापाल) यांनी 'पंचप्रण' - सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर आपले अभ्यासपूर्ण चिंतन मांडले.

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय, लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमराव कांदे (रा.स्व.संघ, जालना विभाग), प्रमुख व्याख्याते प्रकाश पाठक (सनदी लेखापाल, धुळे), बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, बँकेच्या माजी अध्यक्ष व विद्यमान संचालिका शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, प्रा.अशोक लोमटे, बाळासाहेब देशपांडे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. तृतीय पुष्प गुंफताना प्रकाश पाठक (धुळे) यांनी 'पंचप्रण' - सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर बोलत असताना सांगितले की, आजच्या व्याख्यानाचा विषय आपल्या जगण्याशी एकरूप आहे. 'पंचप्रण' - म्हणजे कुटुंब, समरस जीवन, पर्यावरण, स्वदेशी जागरण आणि नागरिकांची कर्तव्ये हे समजून घेवून देशासाठी त्याग, समर्पण भावनेतून बलिदानासाठी तत्पर असणे होय, या देशावर प्रेम करावे, संस्कृती संवर्धन करणे, निष्ठापूर्वक त्याचे पालन करणे आवश्यक आहे. आपली धारणा, निती मुल्यांवर श्रध्दा ठेवून वाटचाल करणे, समाजजीवन हे रथचक्रासारखे आहे. भूमिचा स्वर्ग करणारी माणसं कार्यरत झाली की, आपण पतनाकडून उत्थानाकडे जातो. जगात अनेक संस्कृती निर्माण झाल्या आणि कालौघात त्या नष्ट ही झाल्या पण, हिंदू धर्म व संस्कृती विनाशाच्या कालखंडातही संपुष्टात आली नाही. अध्यात्मिक राष्ट्र अशी जगात भारताची ओळख आहे. सामुहिक प्रयत्न व सर्वसमावेशकता जोपासल्यामुळे हे शक्य झाले आहे. समाजाच्या उत्थानासाठी स्वतःला गाडून घेण्याची भूमिका घ्यावी लागते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आदर्श




संकल्प, सातत्यपूर्ण विधायक कार्य आणि मार्गदर्शक सुत्रांमुळे सामाजिक जीवनात त्याचे चांगले पडसाद पहावयास मिळत आहेत. म्हणून आज विविध क्षेत्रात आदर्श, चारित्र्यसंपन्न, राष्ट्रप्रेमी, समर्पण, न्याय भूमिका, निष्कलंक, निष्कपट भावना जोपासत सेवाकार्य करीत योगदान देणारी व्यक्तीमत्व निर्माण झाली आहेत असे सूचक वक्तव्य पाठक यांनी केले. स्वातंत्र्य, बंधूता, समजूतदारपणा, कुटुंब व्यवस्था, नातेसंबंध, संस्कार, संस्कृती, पर्यावरण संवर्धन, देशाभिमान, सामाजिक समरसता, स्वयंपूर्णता, स्वयंसज्जता, स्वयंसक्षमीकरण, कर्तव्यधिष्ठता निर्माण झाली पाहिजे. यासाठी भारतीयांनो वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक आणि सामाजिक पातळीवर आपण एकत्र येऊन सामाजिक परिवर्तनासाठी सुरूवात केली पाहिजे. आज संपूर्ण जग हे विध्वंसाला वैतागले आहे, भारताच्या पुढाकाराने जगात शांतता प्रस्थापित व्हावी अशी अपेक्षा करतेय, विश्वगुरू म्हणून आपल्यावर असलेल्या या जबाबदारीची जाणीव ठेवून नि:स्पृह, त्याग भावनेतून आपले योगदान द्यावे व भविष्यातील यशस्वी वाटचाल करावी असे आवाहन प्रकाश पाठक (धुळे) यांनी केले.



प्रारंभी बँकेच्या संचालिका शरयूताई हेबाळकर यांनी 'सहकार भारती - सहकाराचे एक शिखर संघटन' या विषयावर बोलत असताना आण्णासाहेब गोडबोले, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, माधवराव गोडबोले आणि लक्ष्मणराव इनामदार यांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण केले. 'सहकार भारती स्थापना दिवस' निमित्त मागील ४६ वर्षांपासून सहकार भारती सहकार क्षेत्रात करीत असलेल्या कार्याची नेमकी माहिती दिली. यावेळी 'सहकार भारती जिंदाबाद' चा जयघोष करण्यात आला. अध्यक्षीय समारोपपर भाषणात उत्तमराव कांदे (रा.स्व.संघ, जालना विभाग) यांनी दीनदयाळ बँकेने परिसरातील बँका, पतसंस्था, पतपेढी व सहकारी संस्था यांच्याकरिता प्रशिक्षण आयोजित करावे व त्यांना सहकार भारती परिवाराशी जोडावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सुरूवातीला पाहुण्यांचा परिचय बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी करून दिला. सुत्रसंचालन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संचालक बाळासाहेब देशपांडे यांनी मानले. सौ.लताताई पत्की यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी अंबाजोगाईतील विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, युवक, रसिक श्रोते उपस्थित होते. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. तसेच १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले या सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वासराव कदम सर यांच्या हस्ते केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक शिवाजीराव मोरे प्राध्यापक बाळासाहेब जोशी कार्यक्रमाधिकारी डॉक्टर




शिवाजीराव काकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते सर्वप्रथम राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉक्टर शिवाजीराव काकडे यांनी केले प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना राजमाता जिजाऊ यांच्या विचारातून स्वराज्याची निर्मिती झाली तर स्वामी विवेकानंद यांची युवकाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले तर प्रा सोमनाथ घाडगे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना स्वामी विवेकानंद यांचे योगदान व राजमाता जिजाऊ यांच्या शिकवणीतून स्वराज्याची निर्मिती झाली आणि छत्रपती शिवाजी महाराजांसारखा राजा आपल्याला मिळाला आपले हे भाग्य आहे असे मनोगत व्यक्त केले प्राध्यापक शिवाजीराव भोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले प्राध्यापक बाळासाहेब जोशी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे संचालन डॉ लोखंडे बी बी यांनी केले तर आभार प्राध्यापक रकटे मॅडम यांनी मांडले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी प्राध्यापक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते श्री अनिल शिंदे श्री शहाजी लमुळ सौ नाईक नवरे मावशी यांनी मोलाचे सहकार्य केले

# उमेश मोगरेकर यांचे कार्य गौरवास्पद -अजित वरपे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुका प्रतिनिधी म्हणुन मागील तिन दशकं एकनिष्ठ व विश्वासपात्र पत्रकारिता उमेश मोगरेकर यांनी केली असुन त्या एकनिष्ठतेचं फळं त्यांना दर्पण पुरस्कार जाहिर झाला आहे. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातुन केलेल कार्य निश्चीतच गौरवास्पद असल्याचे मत झुंजार नेताचे संपादक अजित वरपे यांनी व्यक्त केले.

माजलगाव येथील वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी. आर. डक यांच्या निवासस्थांनी दर्पण पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल उमेश मोगरेकर यांचा तर उपनयन संस्कार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सचिन देशमुख, उपाध्यक्षपदी मा. नगरसेवक विनायक रत्नपारखी, कार्यवाहक बप्पासाहेब देशमुख तसेच उद्योजक सतिष सितकर यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन दि. १० जानेवारी २०२५ रोजी मित्रपरिवारांच्या वतीने आयोजित केलेल्या सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी पूरोहित



महासंघाचे जिल्हाध्यक्ष अनंतशास्त्री जोशी तर प्रमुख पाहुणे म्हणुन झुंजार नेताचे संपादक अजित वरपे, जाहिरात मुख्यव्यवस्थापक राहुल जामकर, जेष्ठ पत्रकार संतोष मुळी, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, पुरूषोत्तम करवा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना श्री. वरपे म्हणाले की, माजलगाव तालुक्याच्या शेती, सिंचन, आरोग्य यासह सामाजिक समस्या प्राधान्याने मागील तिन दशकांपासुन येथील तालुका प्रतिनिधी असणारे उमेश मोगरेकर हे सातत्याने प्रभावीपणे मांडुन हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असतात. एकनिष्ठ पत्रकारितेचं फळं म्हणुन त्यांना दर्पण पुरस्कार जाहिर झाला आहे. यावेळी बोलतांना अनंतशास्त्री जोशी म्हणाले की, उमेश मोगरेकर यांना जिवनामध्ये काम करत असतांना कशाला धरायचे व कशाला सोडायचे या गोष्टीची जाण असल्यामुळे आज ते कायमच मित्रपरिवारासाठी मार्गदर्शकाची भुमिका बजावतात. आगामी काळात महाराष्ट्र शासनाचा दर्पण पुरस्कार मिळावा अशी अपेक्षा व्यक्त करत उपनयन संस्कार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सचिन देशमुख यांची केलेली नियुक्ती निश्चीतच समाज हितासाठी राहिल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी उमेश मोगरेकर म्हणाले की, मिळालेला दर्पण पुरस्कार हा माजलगावकरांचा सन्मान आहे. मागील तिन दशकं एकमेव झुंजार नेता या दैनिकात काम करत असल्याने या एकनिष्ठतेची दखल घेत हा पुरस्कार जाहिर झाला असल्याचे समजते. आज केलेला हा सत्कार निश्चीतच प्रेरणादायी व उर्जा देणारा ठरेल. प्रास्ताविकात वकील संघाचे अध्यक्ष बी. आर. डक यांनी सांगीतले की, विवीध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत असणा-यांचा व मित्रपरिवारांना मिळत असलेल्या पुरस्कार व निवडीबद्दल सन्मान करण्याची संधी मिळाली असल्याचे सांगीतले. सुत्रसंचालन कमलेश जाब्रस यांनी केले तर आभार मुकुंद जोशी यांनी मानले. यावेळी लॉकडाउन, जाणिव व टेंबे गणेश मंडळाचे अनेक सदस्य उपस्थित होते.

# सेलू येथील राज्यस्तरीय पत्रकार मेळाव्यास मंत्री संजय शिरसाट उपस्थित राहणार

सेलू । प्रतिनिधी

मराठी मराठी पत्रकार परिषद मुंबईच्या सेलू येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तालुका अध्यक्ष पत्रकार संघ मेळावा व आदर्श तालुका पुरस्कार वितरण सोहळ्यास सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट हे उपस्थित राहणार असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे यांनी दिली आहे या बाबत माहिती अशी की दिनांक दिनांक १ फेब्रुवारी २५ रोजी सेलू येथील साई नाट्य मंदिर येथे राज्यस्तरीय तालुका पत्रकार संघ अद्यक्ष यांचा मेळावा व आदर्श तालुका संघ पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण काल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे यांच्या नेतृत्वाखाली सेलू तालुका



पत्रकार संघाचे अध्यक्ष लक्ष्मण बागल, मो. इलियास, मोहसीन भाई, कांचन कोरडे, शेख राज यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांना पत्रकार परिषदेच्या वतीने सेलू येथील मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रण दिले असता त्यांनी ते स्वीकारले असून मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यक्रमास उपस्थित राहणे हे आपल्यासाठी गौरवपूर्ण बाब असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या वेळी त्यांनी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त मा. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मराठी पत्रकार परिषद पत्रकारांच्या कल्याणासाठी करत असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले असून आपण निश्चित सेलू येथे येणार असल्याचे मराठी पत्रकार परिषद व सेलू तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकारयांना बोलताना आवर्जून सांगितले. सेलू येथील तालुका अद्यक्ष मेळाव्याची जोरदार तयारी सुरू आहे.

# राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील केकतसारणी येथील राजमुद्रा प्रतिष्ठान व गावकऱ्यांच्या वतीने राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीच्या निमित्ताने स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली देखील वाहण्यात आली छत्रपती शिवाजी महाराजांच्या माध्यमातून रयतेचे स्वराज्य निर्माण करण्यासाठी मासाहेब जिजाऊ यांनी आयुष्य वेचले त्यांनी हिंदवी स्वराज्य संकल्प मांडला होता. तो संकल्प छत्रपती शिवाजी महाराजांनी पूर्ण केला आणि रयतेला स्वराज्य मिळाले परंतु आज जिल्ह्यामध्ये तालुक्यामध्ये अशा भयंकर घटनेमुळे छत्रपतींच्या विचाराची जिजाऊंच्या विचाराची गरज आज देशाला आहे. जेणेकरून अशा अमानवी घटना घडणार नाहीत. त्यांच्या विचाराचा जागर करणे गरजेचे असे देखील मान्यवरांनी बोलताना सांगितले.

# आदर्श गुरुकुलमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, आदर्श गुरुकुल येथे राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस आदर्श गुरुजींचे मार्गदर्शक कार्यक्रमाचे अध्यक्ष , प्रमुख पाहुणे पालक प्रतिनिधी , शिक्षक व विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजन करून सुरुवात केली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी केले.

विद्यार्थ्यांनी जिजाऊ वंदना, पोवाडे, गीत, गाणी, चारोळ्या, भाषणे केली. प्रमुख पाहुणे बालाजी बचाटे म्हणाले युवकांनी स्वामी विवेकानंद आदर्श घ्यावा! पवन महाराज धपाटे म्हणाले आपल्या आई फक्त आपलीच आहे जिजाऊ मासाहेब सर्व राष्ट्रांची राष्ट्रमाता आहेत! कार्यक्रमाचे अध्यक्ष केशव बादाडे म्हणाले स्वामी विवेकानंदा सारखे अभ्यासू, वाचक, शिस्तप्रिय आणि आज्ञाधारक विद्यार्थी घडावेत! तसेच राजमाता जिजाऊंची प्रेरणा घेऊन छत्रपती शिवाजी महाराज घडले तसे आपली आई अगोदर जिजाऊ झाल्या तर प्रत्येक मूल शिवरायांसारखे घडेल! कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील बुरंगे यांनी केले, सूत्रसंचालन रोहन सिंनगारेनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओंकार बादाडे परिश्रम घेतले. प्रमुख उपस्थिती मालनबाई अंबुरे, सावित्री बादाडे, सरला बुरंगे, कोमल काळे व आदर्श गुरुकुलचे विद्यार्थी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज तालुक्यातून सर्वप्रथम

सारणी । प्रतिनिधी

शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान सरकारमार्फत राबविण्यात आली.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाचा दुसरा टप्प्याचा निकाल जाहीर झाला आसून यामध्ये केज तालुक्यात सारणी (सांगवी) येथील श्री विठ्ठल मा.व उच्च मा. विद्यालयाचा प्रथम येण्याचा मान मिळवला. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हा एक अनोखा उपक्रम आहे, जो महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात सुधारणा करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याची



## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा (दुसरा टप्पा) स्पर्धेचे निकाला जाहिर; ३ लक्ष रु.चे पारितोषिक पटकावले

यशस्वी पूर्तता जाहीर केली, ज्यामध्ये राज्यातील विविध शाळांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ यामध्ये ग.शि.अ. लक्ष्मणजी बेडसकर, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनिल केंद्रे, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी चाटे व केंद्रप्रमुख आयु. धम्मदीपा दरबारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल माध्यमिक व उ.मा. विध्यालय सारणी (सा) या शाळेने केज तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवला. शाळेने ३ लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले, यामुळे शाळेचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.या स्पर्धेतील विजेत्यांची निवड तहसीलदार, बी.डी.ओ. व गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत झाली.शाळेमध्ये भौतिक सुविधांसह विदयार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सातत्याने प्रयत्न करत आहेत. या यशाबद्धल संस्थेचे कार्याध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे, संस्थेचे अध्यक्ष विजयकांत मुंडे ,सचिव अतुल मुंडे, प्राचार्या माधुरी मुंडे व सर्व खातेप्रमुख यांनी प्राचार्य सचिन हांगे, पर्यवेक्षक उद्धव मुरकुटे व संपूर्ण स्टाफ यांचे कौतुक व अभिनंदन केले.

# बाणाई प्रतिष्ठान करणार मुलींच्या जन्माचे स्वागत

## प्रा. बबनराव आंधळे यांचा नवा संकल्प; गावात जन्म घेणाऱ्या मुलींच्या नावे करणार दहा हजार रुपये एफडी

**बीड । प्रतिनिधी**

या वर्षात मुलींचा जन्मदर वाढावा म्हणून नविन वर्षात नवा संकल्प प्राध्यापक बबनराव आंधळे हे राबवणार आहेत. आज बाणेगाव येथे जिल्हा परिषद शाळेत मुलांना शालेय साहित्य वाटप करत सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. बीड जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षापासून मुलींचा जन्मदर कमीच आहे. गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यात ग्रामीण भागात गर्भपाताच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडलेल्या आहेत. मुली जन्म घेण्या अगोदरच तिला मारलं जातं म्हणून बीड अगोदरच राज्यभर बदनाम आहे. आपण भारत देशाचे सुज्ञान नागरिक आहोत याच दृष्टिकोनातून मुलींचा जन्मदर वाढण्यासाठी कोणत्याही आई-वडिलांनी कुटुंबातीन नातेवाईकांनी तसेच डॉक्टरांनी मुलींचा गर्भपात केला जाऊ नये. तसेच मुलींचा जन्मदर वाढला पाहिजे. मुलगी जगली पाहिजे- मुलगी शिकली पाहिजे. म्हणूनच बाणाई सामाजिक प्रतिष्ठान बाणेगाव. च्या माध्यमातून मुलीच्या जन्माचे स्वागत होणार आहे. तसेच समाजात होत असल्या गर्भपाताच्या घटना व मुलींच्या बाबतीत झालेली बदनामीं थांबावी. आणि बीड जिल्ह्यात सह महाराष्ट्रातील मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी सातत्याने शासन प्रशासन प्रयत्न करते मात्र मानवी मानसिकेच्या दृष्टिकोनातून पाहिलं गेलं तर मुलीच्या नावे ओरड आजही ग्रामीण भागात केली जात आहे. मुलींचा जन्मदर वाढावा म्हणून नव्या वर्षात केज तालुक्यातील बाणेगावातील कोणत्याही समाजातील सुनबाईला जर मुलगी झाली तिचं स्वागत गावभर गुळ वाटप करत मुलींचा जन्मोत्सव म्हणून मुलींच्या नावे दहा हजार रुपये एफडी करणार असल्याचं प्रा. आंधळे यांनी जाहीर केला आहे.

सविस्तर वृत्त आज जन्मगावी बाणेगाव येथे सर्व मित्र परिवार यांच्या सहकार्याने वाढदिवसानिमित्त नवा संकल्प केला आहे. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात बानेगाव हे ग्रामीण भागात आहे या गावातील अनेक गावकरी हे ऊस तोडणीसाठी बाहेरगावी जातात. जवळपास ६०० उंबरा असलेला हे गाव याच गावातील बबनराव दगडू आंधळे यांचा जन्म १९७५ रोजी बाणेगावला झाला. आई-वडील शेतकरी एक भाऊ परमेश्वर आंधळे हा शेतीचं करतोय. प्राध्यापक बबनराव आंधळे यांचे प्राथमिक गावातच झालं. माध्यमिक व उच्च माध्यमिक बीड या ठिकाणी झालं ते सध्या १९९३ पासून संत तुकाराम प्राथमिक विद्यालय बीड येथे मुख्याध्यापक पदावर कार्य करत आहेत. लहानपणापासूनच सामाजिक सेवाभाव हा गुणधर्म त्यांच्यात आहे नविन वर्षात नवा संकल्प करत त्यांनी गावातीलच बाणाई सामाजिक प्रतिष्ठान बानेगाव च्या माध्यमातून बाणेगावात जन्मलेल्या मुलींचा त्यांच्या नावे दहा हजार रुपये एफडी करणार असल्याचं जाहीर केला आहे. बाणाई प्रतिष्ठाच्या अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य सौ.कावेरीताई बबनराव आंधळे. यांच्यामार्फत पुढील अनेक वर्ष हे उपक्रम राबवला जाणार आहे. असे बाणाई सामाजिक प्रतिष्ठानच्या अध्यक्ष कावेरीताई बबनराव आंधळे तसेच प्रसिद्धी प्रमुख ज्ञानोबा वायबसे यांनी कळवले आहे. यावेळी रवींद्र बांगर, विकास मुंडे, रमेश जाधव, विनायक मजमुले, गावचे सरपंच राम मोराळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संतोष मोराळे, परमेश्वर आंधळे, सखाराम आंधळे, अंगद मोराळे संकेत सिलवर, सुभाष मोराळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# प्रलंबित कामे जलदगतीने पूर्ण करा जनतेच्या कामांना प्राधान्यक्रम द्या, मतदार संघात नवनवीन योजना राबविण्यासाठी अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवावी - आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षांपासून आष्टी मतदार संघात प्रशासकीय यंत्रणेचा सुरू असलेला अनागोंदी कारभार माझ्या काळात मी खपवून घेणार नाही.तसेच मतदार संघातील रखडलेले प्रकल्प जलदगतीने पूर्ण कसे होतील यासह सर्वसामान्य जनतेच्या कामांना प्राधान्यक्रमाने सोडवून मतदार संघात नवनवीन योजना राबविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवून विकास कामांना गती देण्याची गरज असल्याचे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले.

शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता आष्टी पंचायत समिती कार्यालय सभागृहात बीडचे जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कृषी व पाटबंधारे विभागाची आढावा बैठक घेतली.या बैठकीत , प्रलंबित खुंटेफळ साठवण तलाव योजने संदर्भात जलद गतीने पावले उचलून कामास गती देणे.वन विभागाच्या क्षेत्रावर असलेल्या ग्लिरिसिडीया या वनस्पतीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे विदारक चित्र समोर येत असून त्या ऐवजी वड, पिंपळ आदी वृक्षांची लागवड मनरेगाच्या माध्यमातून प्राधान्यक्रमाने करणे,सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढविणे,सुरत चेन्नई या महामार्गासाठी आष्टी मतदार संघातून जात असलेल्या राष्ट्रीय मार्ग-४६ रस्त्याबाबत जमीन अधिग्रहण करणे,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी महामंडळाच्या फेऱ्या वाढवणे तसेच मच्छिंद्रनाथ गडावर मुक्कामी बस सुरू करणे,

पिंपळा लोणी मार्गे अहमदनगर ही बस सुविधा यासह महिंदा, मोराळा, पाटसरा यासह ग्रामीण भागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून देणे,जिल्हा परिषद,अंतर्गत कार्यरत शिक्षण विभाग, ग्रामसेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना येथे अधिकारी कर्मचारी यांची प्रमाणित बिंदूनामावली तपासणे,जिल्हापरिषद शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे, प्राथमिक




पदवीधर, विस्तार अधिकारी मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करणे,काही ग्रामपंचायत मध्ये सरपंच, ग्रामसेवक यांना विचारात न घेता बोगस सह्या करून पैसे उचलले आहेत त्यांच्यावर तत्काळ कार्यवाही करणे,सावरगांव परिसर अविकसित क्षेत्र घोषित जिल्हा परिषद लघुपाटबंधारे,जलसंधारण विभाग गावतलाव,पाझर तलाव दुरुस्ती करणे,वीज वितरण विभागाच्या टाकळी (अ)- अतिक्रमण नवीन सबस्टेशन, सोलार पंप, अतिरिक्त होणाऱ्या विद्युतदाबा बाबत निर्णय घेणे.शिराळ आणि महिंदा- येथील उपकेंद्रासाठी जागा खरेदी करणे, मोराळा येथील ४२ एकर जागेचा विचार करणे,आष्टी, पाटोदा, शिरूर (का) येथील नवीन बस स्थानक कामांचा वेग वाढवणे,

पैठण-पंढरपूर पालखी मार्ग भुसंपादन. अतिक्रमण यामुळे शिरूर का. शहर, डोंगरकिन्ही(मळेकरवाडी) पाटोदा शहर (पारगाव रोड) इ.ठिकाणी काम वन विभाग परवानगी घेऊन पूर्ण करणे,पांगरी-जाधववाडी साठवण तलाव

भुसंपादन प्रक्रिया पूर्ण करणे, शेती, झाडे, पक्षी विहीर यांचे मूल्य मापन पूर्ण करणे,उखळवाडी – जाटनांदूर साठवण तलाव भूसंपादन अपूर्ण असून गॉर्ज (घळभरणी) बुजवणे काम बाकी,नष्ट मालमत्तेचे मुल्यमापन करणे,सिंदफना प्रकल्प, खोलीकरण व उंची वाढविणे,सर्व क्षेत्र बागायती होणे साठी कॅनॉल दुरुस्ती करणे,वाघाचावाडा साठवण तलावाचे काम वेगाने सुरू करणे यासह विविध विषयांवर चर्चा झाली.तसेच १३ जानेवारी २०२५ पासून आष्टी मतदारसंघात व्ही रमणी आणि जरेवाडी पॅटर्न सुरू होणार असून यामुळे शाळाबाह्य होत असलेल्या ऊसतोड मजुरांची मुले मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि शिक्षण सुविधा सहज आणि सोप्या पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी हा पॅटर्न अत्यंत महत्त्वाचा असून त्याची अंमलबजावणी करणे यासह विविध विषयांवर चर्चा झाली.यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव,उपविभाग अधिकारी पाटोदा वसिमा शेख,बीड पाटबंधारे विभाग वरिष्ठ अभियंता चिस्ती , वरिष्ठ अभियंता थोरात धाराशिव पाटबंधारे विभाग,कार्यकारी अभियंता कृष्णाजी घुगे कृष्णा खोरे, कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, कार्यकारी अभियंता पवार, कार्यकारी अभियंता गलांडे ,कार्यकारी अभियंता आमले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, जिल्हा परिषद बीड, जिल्हा वनसंरक्षक अधिकारी श्री गर्कळ, वनविभाग प्रादेशिक, श्री सांगोळे वन्यजीवलजल मयूर अभयारण्य, तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील मॅडम, परिवहन विभाग नियंत्रक दुसाने मॅडम, मृद व जलसंधारण व अभियंता जलसंपदा उपाभियंता लाभक्षेत्र अधिकारी पोलीस निरीक्षक श्री भुतेकर यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## माजलगाव एमआयडीसीमध्ये चार वर्षे निशुल्क मुदतवाढ द्या

माजलगाव । प्रतिनिधी

येथील एमआयडीसीमध्ये चार वर्षे निशुल्क मुदतवाढ द्या व सर्व प्लॉट धारकांना जनरल झोनचा परवाना द्यावा अशी मागणी प्रादेशिक अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माजलगाव येथील सर्व प्लॉट धारकांनी निवेदनाव्दारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव एमआयडीसी मध्ये आणखी सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत व या ठिकाणी सर्व उद्योजक नवीन असल्यामुळे त्यांना अनेक प्रकारचे परवाने काढण्यासाठी तसेच अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे उद्योग उभारणीमध्ये अडचणी येत आहेत. उद्योजकांना उद्योग सुरू



**सर्व प्लॉट धारकांना जनरल झोनचा परवाना द्या-प्रादेशिक अधिकाऱ्यांकडे मागणी**

करण्यासाठी पूरक असलेले मोठे उद्योग अद्यापही या एमआयडीसीमध्ये चालू झालेले नाहीत. माजलगाव एमआयडीसी डी झोन मध्ये असल्यामुळे या ठिकाणी कर्ज पुरवठा बँका लवकर करत नाहीत त्यामुळे भांडवल उभारणीसाठी सुद्धा अडचण निर्माण होत आहेत. अनेक उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी सदरील एमआयडीसीमध्ये चार वर्षाकरिता निशुल्क मुदतवाढ देण्यात यावी तसेच टेक्सटाईल सर्जिकल कॉटन झोन काढून जनरल झोन मध्ये सर्व पान ३ वर

## आष्टा हरीनारयण येथे वाचन संकल्प



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील आष्टा हरीनारयण येथील जिल्हा परिषद शाळेत वाचन संकल्प महाराष्ट्राचा आणि स्कूल कनेक्ट २.० हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टी येथील ग्रंथपाल सुनील मुटकुळे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ अभय शिंदे तसेच ग्रंथालय सहाय्यक श्री सचिन निकाळजे यांनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व आणि पुस्तक परीक्षण याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री जगताप सर होते.

दिवसेंदिवस कमी होत चाललेली वाचन संस्कृती आणि वाढत चाललेला मोबाईलचा वापर ह्यामुळे विद्यार्थी व्यवस्थित अध्ययन करू शकत नाहीत. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी वाचन संकल्प आवश्यक असल्याचे सांगून डॉ. अभय शिंदे यांनी वाचनाचे महत्व विशद केले. डॉ. सुनील मुटकुळे वाचनाचे विविध प्रकार सांगून हंबर्डे महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट देण्याचे पान ३ वर

## जैन युवाचार्य महेंद्रऋषिजी म.सा. यांचे मंगळवारी कडा येथे आगमन

**अमोलक शताब्दी महोत्सवा निमित्त अमोलक इंजिनिअरिंग कॉलेजचा संकल्प**

आष्टी । प्रतिनिधी

जैन युवाचार्य महेंद्रऋषीजी महाराज साहब यांचे कडा येथे मंगळवारी ( दिनांक १४ ) आगमन होणार आहे. त्यांच्या आगमनानिमित्ताने येथील अमोलक शिक्षण संस्थेच्या अमोलक इंजिनिअरिंग कॉलेजचा संकल्प देखील करण्यात येणार आहे. कडा येथे युवाचार्यांचे स्वागत करण्यासाठी श्री अमोलक जैन विदया प्रसारक मंडळ आणि वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ कडा यांच्या संयुक्त विदयमानाने भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. युवाचार्या श्री महेंद्रऋषीजी महाराज साहेब, प. पू. हितेंद्र ऋषिजी म.सा. व



प.पू. धवलऋषिजी म.सा. व उपप्रवर्तनीनी प.पू. दिव्यज्योतीजी म.सा. आदि ठाणा ०४ यांचे भव्य स्वागत करण्यात येईल . युवाचार्याच्या स्वागतासाठी काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेमध्ये अमोलक शिक्षण संस्थेच्या सर्व विभागातील विदयार्थी व विदयार्थीनी विविध प्रकारच्या आकर्षक वेशभूषा करुन शोभायात्रेची शोभा वाढविणार आहेत. अमोलक जैन विदया प्रसारक मंडळाचे शताब्दी वर्ष सोहळया निमित्त युवाचार्याचे आगमन हे संस्थेसाठी दुग्धशर्करा योग आहे. राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडु, आंध्रप्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड, महाराष्ट्र या राज्यांमध्ये प.पू. गुरुवरांनी विहार करुन प. पूज्य महावीरांच्या व आनंदऋषीच्या विचारांचा प्रसार केला आहे. तसेच सन २०२४ चा बंगलोर येथील चातुर्मास समाप्ती नंतर एक हजार किमीचा विहार करुन त्यांचे कडा येथे आगमन होत आहे. युवाचार्य श्री पान ३ वर

## शासकीय कापुस खरेदी पुढील आदेश येईपर्यंत बंद राहिल –सभापती नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील बाजार समिती अंतर्गत असलेल्या शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापसाची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने तसेच ढगाळ वातावरणामुळे



सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत कापुस खरेदी बंद राहणार असल्याने शेतक-यांनी कापुस विक्रीस आणु नये असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.

येथील बाजार समिती अंतर्गत मनकॉट जिनिंग, पुर्वा जिनिंग, कुणाल जिनिंग, कॉटसिट जिनिंग, एच. जे. कॉटन, महाराष्ट्र जिनिंग पात्रुड याठिकाणी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर सिसीआयकडुन कापसाची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे जिनिंगमध्ये कापुस ठेवण्यास जागा उपलब्ध नाही व वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांचे नुकसान होउ नये याकरीता शेतकरी बांधवांनी दि. १२ जानेवारी पासुन ते सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत शासकीय कापुस खरेदी बंद राहिल याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी तसेच पुढील आदेश येईपर्यंत शासकीय खरेदी केंद्रावर शेतकरी बांधवांनी कापुस विक्रीस आणु नये असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

## माणसाने आपल्या आयुष्यात शिष्टाचार जरूर पाळावेत पण शिष्ट कधीच असू नये -ॲड. कल्याणी विर्धे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आंतरभारती शाखा अंबाजोगाई तर्फे दिनांक ११/०१/२०२५ रोजी मेरी बात या उपक्रमाचा ११ वा भाग संपन्न झाला. या कार्यक्रमात कायदेतज्ञ, सामजिक कार्यकर्त्या, आंतरभारती शाखा अंबाजोगाई च्या कार्यकारणी सदस्य, योगेश्वरी शिक्षण संस्था च्या संचालिका ऍड. कल्याणी विर्धे यांनी आपला प्रेरणादायी जीवन प्रवास व्यक्त केला.

आपला जीवनातील प्रवासाचे वर्णन करताना ऍड. विर्धे म्हणल्या की, शालेय जीवनापासून तत्त्वाशी तडजोड करणे जमलेच नाही, एनसीसी मुळे आयुष्याला शिस्त मिळाली, वाचनाची आवड व विचार करण्याची प्रेरणा यामधून समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी आपण काहीतरी करू शकतो ही भावना निर्माण झाली. आयुष्याकडे सकारात्मक पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला. आयुष्यात संघर्ष मेहनत घ्यावीच लागते पण त्याची फळे चांगलीच येतात.




वकील व्यवसायातील माझे गुरु माझे पती ऍड. जयदीप विर्धे यांच्या प्रोत्साहनातून वकिली व्यवसायात उत्तुंग कार्य करू शकले. वकिली व्यसायात अंबाजोगाई संघाच्या सहसचिव, सचिव, मनस्विनी महिला प्रकल्पाच्या कायदेविषयक सल्लागार म्हणून कार्य करू शकले.

आपल्या मनोगतचा समरोप करताना ऍड. विर्धे म्हणल्या की, माणसाने आपल्या आयुष्यात शिष्टाचार जरूर पाळावेत पण शिष्ट कधीच असू नये. कुटुंबातला संवाद दुरावला जाऊ नये कुटुंब संस्था टिकवणे हे आपल्याच हातात आहे. माणूस म्हणून आपण स्वतःचा सन्मान तर करावाच पण इतरांचाही सन्मान केलाच पाहिजे. असे मनोगत ऍड. कल्याणी विर्धे यांनी आंतरभारतीच्या मेरी बात या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

हा कार्यक्रम अंबाजोगाई येथील मंगळवार पेठेतील मानलोकच्या जनसहयोग कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महावीर भगरे यांनी ऍड. कल्याणी विर्धे यांचे पुस्तक देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन व्यंकटेश जोशी यांनी केले. या कार्यक्रमासाठी आंतरभारतीच्या अध्यक्ष डॉ.प्रा. शैलजा बुरुरे, सचिव श्री. संतोष मोहिते कोषाध्यक्ष महावीर भगरे, ऍड. जयदीप विर्धे, दत्ता वालेकर, विनायक गडेकर, शरद लंगे, व्यंकटेश जोशी, राजेंद्र कुलकर्णी, किरण असरडोकर, वर्षा देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## गोडाऊन बंद ठेऊन हमाल संघटनेला पाठिंबा

घाटनांदुर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गोदामातील हमालांचे ऑगस्ट ते डिसेंबर पर्यंत या पाच महिन्यापासून ची मजुरी व अन्य मागण्यासाठी काम बंद आंदोलन शुक्रवार दि १० जानेवारी रोजी लाक्षणीक काम बंद आंदोलन शासकीय धान्य गोदाम हमाल संघटना बीड यांच्या वतीने करण्यात आले होते या संघटनेला पाठिंबा म्हणून घाटनांदुर येथील शासकीय धान्य गोदामातील हमाल संघटनेच्या वतीने शासकीय धान्य गोदाम काम बंद ठेवून बंद पाळण्यात आला. प्रशासनाने पाच महिन्याची मजुरी देऊन तसेच अन्य मागण्या लवकरात लवकर मान्य करून सर्व हामालाना न्याय देऊन सहकार्य करावे असे सांगण्यात आले.

## आजपासून शृंगेरी देवी यात्रा उत्सवास सुरुवात

**उद्या कुस्त्यांचे जंगी सामने, पंधरा दिवस चालणार यात्रा उत्सव**

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील शृंगेरी देवी यात्रा उत्सवास आज दि. १३ जानेवारीपासून सुरुवात होत आहे. हा उत्सव पंधरा दिवस चालतो तर दि. १४ जानेवारी रोजी भव्य कुस्त्यांचे मैदान होणार असल्याची माहिती शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्ट च्या वतीने देण्यात आली आहे.



आष्टी तालुक्यातील ब्रह्म गाव येथील शृंगेरी देवी देवस्थान हे जागृत देवस्थान म्हणून राज्यभर ओळखले जाते. देवस्थानावर वर्षभरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. यामध्ये नवरात्र उत्सव आणि पौष पौर्णिमेपासून सुरू होणारा यात्रा उत्सव हे दोन प्रमुख उत्सव साजरे होतात. यावर्षी दि. १३ जानेवारी रोजी पौष पोर्णिमा असल्याने दि. १३ जानेवारी यात्रा उत्सवात सुरुवात होणार आहे. हा उत्सव पंधरा दिवस चालतो पौष अमावस्येला यात्रेचे सांगता होईल. दरम्यान पंधरा दिवसाच्या काळामध्ये शृंगेरी देवी देवस्थानावर विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असतात. त्यामध्ये दिनांक १४ जानेवारी रोजी शृंगेरी देवी देवस्थान येथे भव्य कुस्त्यांची दंगल होणार असल्याचे माहिती शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आले आहे. या यात्रा उत्सवामध्ये राज्यभरातून मोठ्या प्रमाणात भाग एक देवीचे दर्शन घेण्यासाठी येतात.

## फुलसांगवी येथे सप्ताहाची जय्यत तयारी

**श्री संत वामनभाऊ महाराज यांचा ४९ वा पुण्यतिथी सोहळा**

शिरूर । शंकर भालेकर

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहचा आरंभअवघ्या दोन दिवसांवर आल्यामुळे गावकऱ्यांच्या वतीने सप्ताहाची जय्यत तयारी चालू आहे.

'वैराग्याचे महामेरु' श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी गेल्या ४९ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात येत आहे. ही परंपरा श्रीक्षेत्र मत्स्यंद्रनाथ गडाचे मठाधिपती वै. महंत निगमानंदजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अविरतपणे चालू आहे. हीच परंपरा गडाचे उत्तराधिकारी महंत जनार्दन बाबा यांनीही अखंडपणे आपल्या प्रभावी नेतृत्वाखाली चालू ठेवली आहे. फुलसांगवीकरांच्या आयोजनातून पार पडत असलेला हा अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्? भागवत कथा नाम यज्ञ सोहळा वर्षानुवर्षे



व्यापक रूप घेऊ लागला आहे. श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त मौजे फुलसांगवी येथे होणारा अखंड हरिनाम सप्ताह म्हणजे पंचक्रोशीतील भाविक भक्तांसाठी अध्यात्म ज्ञान यज्ञाची परभणीत असते. म्हणून या सप्ताह दरम्यान पंचक्रोशी हजारो भाविक भक्त डेरे दाखल होऊन अध्यात्माचा रस चाखत असतात. यावर्षीचा हा अखंड हरिनाम सप्ताह बुधवार दि. १५ जानेवारी रोजी महंत जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व पंचक्रोशीतील संत महंत यांच्यासह भाविक भक्तांच्या उपस्थितीत आरंभ होत आहे. सप्ताह दरम्यान येणाऱ्या भाविक भक्तांची कुठलीही गैरसोय होऊ नये या उद्देशाने गेल्या पंधरा दिवसापासून पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पवार काका-पुतणे एकाच व्यासपीठावर दिसणार!

## अनेक मंत्री, विविध राजकीय पक्षाचे नेते जमणार एकाच व्यासपीठावर, दोन्ही पवारांकडे राज्याचं लक्ष

बारामती । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार (डहरीरव झुरी) आणि उपमुख्यमंत्री अजित पवार (-क्षळीं झुरी) बारामतीत एकाच मंचावरती येणार असल्यानं राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा सुरू झाली आहे. आमदार रोहित पवार यांची सोशल मीडियावरती यासंबंधीची माहिती पोस्ट केली आहे. बारामतीतील कृषी विज्ञान केंद्राच्या कृषीक कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने दोघं एकाच मंचावर येणार आहेत. नमो रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रमानंतर शरद पवार (डहरीरव झुरी) आणि अजित पवार (-क्षळीं झुरी) बारामतीत पहिल्यांदाच एका मंचावर येणार आहेत, त्यामुळे सध्या हा विषय चांगलाच चर्चेत आला आहे.



ग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या वतीने दरवर्षी कृषी प्रदर्शनाचा आयोजन केलं जातं. शरद पवार या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. १६ ते २० जानेवारी दरम्यान बारामतीतील कृषी विज्ञान केंद्रात कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आलेलं आहे. या प्रदर्शनाच्या उद्धाटनाला अजित पवार आणि शरद पवार हे दोघे एकाच मंचावर येणार आहेत. ग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचालित बारामती कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजित दहाव्या कृषिक प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभाला शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार हे बुधवारी (दि. १५) एकाच व्यासपीठावर येणार आहेत. त्यांच्यासोबत अन्य काही नेते, मंत्री देखील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. लोकसभा-विधानसभा निवडणुकीनंतर हे दोघे प्रथमच बारामतीत एका व्यासपीठावर येत आहेत. बारामती कृषी विज्ञान केंद्रावर कृषिकचे आयोजन करण्यात आले आहे. १६ ते २० जानेवारी या कालावधीत हे प्रदर्शन होणार आहे. त्याचे औपचारिक उद्घाटन १५ रोजी होणार आहे. या समारंभाला शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, आमदार रोहित पवार, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव राजेश कुमार आदी उपस्थित राहणार आहेत. शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोघे एकाच व्यासपीठावर येत असल्याने त्याबाबत उत्सुकता आहे. कृषी विकास प्रतिष्ठानचे कामकाज राजेंद्र पवार हे पाहतात.

# पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स असोसिएशनतर्फे राजमाता जिजाऊ माता आणि स्वामी विवेकानंद जयंती जल्लोषात साजरी

पिंपरी । प्रतिनिधी

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचा जन्म दिनांक १२ जानेवारी १५९८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा जवळ देऊळगाव या ठिकाणी झाला. तसेच स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिनांक १२ जानेवारी १८६३ साली कोलकाता येथे झाला.

दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड डव्होकेट्स असोसिएशनचे वतीने त्रिवार अभिवादन करून संपन्न झाला. याप्रसंगी ॲड. अरुण खरात (मामा), माजी अध्यक्ष ॲड. सुनील कडूसकर सर, माजी अध्यक्ष ॲड. प्रमिला गाडे मॅडम, ड. नारायण थोरात सर,



ड. विशाल पौळ, ड. मुस्तफा शेख, ॲड. क्षीरसागर, ॲड. जितिन ठाणांबिर आदी उपस्थित होते. तसेच २०२४-२०२५ कार्यकारणी अध्यक्ष ॲड. पांडुरंग विठ्ठल शिंगारे, उपाध्यक्ष ॲड. यादव सचिव, ॲड. संदीप तापकीर, महिला सचिव ॲड. संगिता रमेश कुशलकर सहसचिव ॲड.पद्मावती पाटील खजिनदार ड.विशाल पोळ हिशोब तपासणीस ॲड. प्रेरणा चंदानी सदस्य ॲड. अक्षय चौधरी, ॲड. पोर्णिमा मोहिते ॲड. सुषमा पाटील ॲड. रुपाली पवार ॲड. विजय भोंडे हजर होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. तेजस चवरे व आभार महिला सचिव ॲड. संगिता रमेश कुशलकर यांनी केले.

# पुणे पोलीस ॲक्शन मोडवर !

## पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण केलेल्या तरुणाला उचललं, दहशत माजवणाऱ्या तरुणांची आणखी एक धिंड काढली

पुणे । प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी मोक्का मधून सुटून आलेल्या आरोपीने रॅली काढली होती, यामुळे पुणे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर टीका सुद्धा झाली. यानंतर पुणे पोलिसांनी आता अशा तरुणांचा चांगला समाचार घेण्याचा ठरवला आहे . याच पार्श्वभूमीवर पुण्यातील खडकी परिसरात आज पोलिसांनी तीन तरुणांची या परिसरातून धिंड काढली. काही दिवसांपूर्वी खडकी परिसरात काही तरुणांनी धारदार शस्त्र घेऊन परिसरात दहशत माजवण्याचा प्रकार केला होता. या तरुणांना पोलिसांनी तात्काळ अटक करून त्यांना खाकी खमक्या दाखवत यांची त्याच भागातून धिंड काढली.

दरम्यान, पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण केलेल्या तरुणाला पोलिसांनी प्रसाद दिलाय. पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्या तरुणावर येरवडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी



गुन्हा दाखल करण्यात आलाय. मिळालेल्या माहितीनुसार, एक मनोरुग्ण आज संध्याकाळी ६.३० वाजता मगर पट्टा भागात दगड फेक करत होता. एका वयस्कर व्यक्तीस तो व्यक्ती मारहाण करू लागला. रासकर चौकात विरुद्ध दिशेने वाहने जाऊ नये म्हणून नेमणुकीस असलेले वाहतूक पोलीस शिपाई पवार यांनी भांडण सोडवण्यास गेले असता त्यावेळी त्या व्यक्तीने पवार यांना मारहाण केली. संबंधित तरुणावर आता येरवडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

# वारजे माळवाडी पोलिसांची मोठी कारवाई; मोक्कातील फरार आरोपीला ठोकल्या बेड्या

पुणे । प्रतिनिधी

मोक्का कारवाईनंतर एमपीडीएसारख्या कारवाईत फरार असणाऱ्या कुख्यात गुन्हेगाराला वारजे माळवाडी पोलिसांनी लोणावळा भागातून बेड्या ठोकल्या आहेत. वारजेत गोळीबार केल्यानंतर मोक्का कारवाई केली. नंतर कारागृहातून जामीन मिळवत बाहेर आला. जामिनावर आल्यानंतर अदखलपात्र गुन्हा केला. पुन्हा पोलिसांनी एमपीडीएसारखी कारवाई केली असता तो फरार झाला होता.

अभिजीत उर्फ चोख्या तुकाराम येळवंडे (वय २४, रा. कर्वेनगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक विश्वजीत काईंगडे,



पोलीस निरीक्षक (गुन्हे) निलेश बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संजय नरळे व त्यांच्या पथकाने केली आहे. अभिजीत उर्प चोख्या येळवंडे हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर प्रथम मोक्का कारवाई केली होती. या कारवाईतून तो काही महिन्यांनी जामिनावर बाहेर आला होता. जामीनावर आलेला असताना त्याने गुन्हा केला होता. या गुन्ह्यानंतर त्याला तडीपार केले होते. तडीपार असतानाही तो पुण्यात शहरात आला आणि त्याने मारामारीचा गुन्हा केला होता. त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे वारजे पोलिसांनी त्याच्यावर एमपीडीए सारखी कडक कारवाई केली होती. कारवाईनंतर मात्र, तो पोलिसांना गुंगारा देऊन पसार झाला होता.

गेल्या तीन महिन्यांपासून तो पसार होता. पोलिसांना गुंगारा देत होता. दरम्यान, नुकताच वारजे माळवाडी पोलीस ठाण्याचा चार्च घेतलेले व कडक शिस्तीचे अधिकारी वरिष्ठ निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी फरार व गुंड प्रवृत्तीच्या गुन्हेगारांची माहिती काढून त्यांना जेरबंद करण्याचे आदेश दिले होते. माहिती घेताना अभिजीत हा लोणावळ्यात लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानूसार, पोलीस पथकाने लोणा भागातून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. त्याने आणखी काही गुन्हे केले आहेत का, याबाबत त्याच्याकडे तपास करण्यात येत आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# शिरुरमध्ये एकाच्या डोळ्यात मिरचीपूड टाकून लुटले; तब्बल लाखोंची रोकड लंपास

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पारोडी (ता. शिरुर) येथील एका डेअरीच्या ऑफिसची कडी वाजवली. दरवाजा उघडल्यानंतर चोरट्यांनी एकाच्या डोळ्यात मिरची पूड टाकून डेअरीच्या ऑफिस मधील साहित्यांचे नुकसान करत लाखोंची रोकड लांबवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिरुर पोलीस स्टेशन मध्ये तीन अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारोडी (ता. शिरुर) येथे राहुल ढमढेरे यांची गगनगिरी मिल्क प्रोडक्ट नावाने डेअरी असून, सदर ऑफिसमध्ये राहुल यांचे वडील माणिकराव झोपलेले असताना रात्रीच्या सुमारास



कोणीतरी कडी वाजवल्याने माणिकराव यांनी कडी उघडली असता तिघा अज्ञात चोरट्यांनी आतमध्ये येत माणिकराव यांना ढकलून देऊन त्यांच्या डोळ्यात मिरचीपूड टाकून धक्काबुक्की केली, दरम्यान तिघांनी ऑफिस मधील साहित्यांची तोडफोड करत ऑफिस मध्ये ठेवलेली चार लाख एकोणीस हजार रुपयांची रक्कम घेऊन पोबारा केला. घडलेल्या घटनेबाबत राहुल माणिकराव ढमढेरे (वय ४२ वर्षे रा. पारोडी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात तीन चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे हे करत आहेत.

# बारामतीमध्ये चारचाकी व ट्रकचा भीषण अपघात; महिला आणि बालके गंभीर जखमी

बारामती । प्रतिनिधी

बारामती रस्त्यावर बारामती तालुक्यातील कोऱ्हाळे बुद्रुक नजीक कठीण पूल येथील तुकाई नगर जवळ चार चाकी व ट्रक चा



भीषण अपघात झाला असून यामध्ये कार चालक, महिला, बालके गंभीर जखमी झाले आहेत.

वालचंदनगर परिसरातील एक कुटुंब आपल्या एक्स यू व्ही कार मधून मांढरदेवी या ठिकाणी काळूबाईच्या दर्शनासाठी बारामती बाजूकडून निरेकडे निघाले होते. तर नीरा बाजूकडून बारामती येथील श्रीनाथ ट्रान्सपोर्ट चा मालवाहतूक करणारा मालट्रक बारामतीच्या दिशेने निघाला होता. हॉटेल रेहान नजीक ट्रकने ( क्र.एम एच ४२ टी ९५४५ ) चुकीच्या बाजूला जात एक्स यू व्ही कारला ( क्र.एम एच १४ इ यू ७३५३ ) समोरासमोर जोरदार धडक दिली. अपघाताची माहिती कळताच वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचाऱ्यांनी तात्काळ जखमींना रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी बारामतीला पाठवले. अपघातानंतर मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा झाला होता. वडगाव निंबाळकरच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी वाहतूक सुरळीत केली. अपघातात महिला व बालके गंभीर जखमी झाल्याने लोकांनी हळहळ व्यक्त केली.

# पोलिसांनी जप्त केला अफुच्या बोंडाचा चुरा; आरोपीवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे: हडपसर भागात अफुच्या बोंडाचा चुरा विक्रीसाठी आलेल्या एका तरुणाला गुन्हे शाखेच्या युनिट दोनने पकडले. त्याच्याकडून अफुच्या बोंडांचा चुरा जप्त करण्यात आला. सुमेरलाल गिरीधारीलाल चौधरी (वय ३० सध्या रा. चिंतामणीनगर, हडपसर, मूळ रा. जोधपूर, राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, सहायक निरीक्षक आशिष कवठेकर, अमोल रसाळ, उपनिरीक्षक नितीन कांबळे, अमोल सरडे, संजय जाधव यांनी ही कारवाई केली. अमली पदार्थ तस्कारांना आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी कंबर कसली आहे.

युनिट दोनचे पथक हद्दीत गस्त घालत होते. तेव्हा हडपसर भागातील सय्यदनगर परिसरात पोलीस कर्मचारी प्रमोद कोकणे, राहुल शिंदे गस्त घालत होते. त्यावेळी चौधरी दुचाकीवरुन तेथे आला होता. तो अफुच्या बोंडाचा चुरा विक्री



करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने चौधरीला ताब्यात घेतले. त्याच्या दुचाकीची डिक्की पोलिसांनी उघडली. तेव्हा डिक्कीत अफुच्या बोंडाचा चुरा सापडला. अफुच्या बोंडाचा चुरा नशेसाठी वापरला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. चौधरीकडून दुचाकी, अफुच्या बोंडाचा चुरा असा ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# पुण्याच्या राखी गुगळेचा १०व्या आशियाई योगा स्पोर्ट्स स्पर्धेत दुहेरी यश!




सिंगापूरच्या सेरांगून रोड येथील पीजीपी हॉलमध्ये ६ ते ८ जानेवारी दरम्यान १०वी आशियाई योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशिप मोठ्या उत्साहात पार पडली. या प्रतिष्ठित स्पर्धेत भारतासह अनेक देशांतील १५० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला.

पुण्याच्या राखी गुगळे यांनी या स्पर्धेत दुहेरी यश संपादन करून देशाला अभिमान वाटावा असा ठसा उमटवला. त्यांच्या या यशानंतर पुण्यात परतल्यानंतर भाजपा नेते, कैबिनेट मंत्री आशिष शेलार आणि हेमंत लेले यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या स्पर्धेत पुण्याच्या राखी गुगळे यांनी अभिमानास्पद कामगिरी करत १७ वर्षांवरील गटातील महिला रिदमिक योगा प्रकारात रौप्यपदक पटकावले. तसेच, त्यांनी ३५ वर्षांवरील पारंपरिक योगा प्रकारात चौथे स्थान मिळवले. त्यांच्या या दुहेरी यशामुळे पुणे शहराचा नावलौकिक उंचावला आहे.राष्ट्रीय योग प्रशिक्षक पांगारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राखी गुगळे यांनी ही कामगिरी साधली. त्यांच्या कौशल्यपूर्ण प्रशिक्षणामुळेच राखी यांनी योगातील उत्कृष्टता साध्य केली आहे.या स्पर्धेमध्ये भारतीय संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळवले असून व्हिएटनाम, सिंगापूर, हाँगकाँग, आणि मलेशिया या देशांना त्यानंतर स्थान मिळाले आहे. राखी गुगळे यांचे यश योग क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी पुणेकरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'बंटस समाजाने स्वत: सह इतर समाजालाही जोडण्याचे काम केले' - चंद्रकांत पाटील

पुणे : बंटस (शेट्टी) समाजाने व्यावसाय, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपल्या समाजाला एकत्रित ठेवण्याचे काम केले आहे. केवळ तेवढेच नाही, तर इतर समाजाला देखील त्यांनी वैविध्यपूर्ण उपक्रमाद्वारे आपल्या समाजाशी जोडण्याचे काम केले, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

पुणे बंटस संघाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त पुणे बंटस संघाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या पुढाकारातून बालेवाडी क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय बंटस क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते. या क्रीडा महोत्सव समारोप व बक्षिस वितरण कार्यक्रम पाटील यांच्या उपस्थितीत रविवारी पार पडता.

यावेळी पुणे बंटस संघाचे अध्यक्ष संतोष शेट्टी,




वाय.चंद्रहास शेट्टी, पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष राकेश शेट्टी, दिनेश शेट्टी, नारायण हेगडे, सुधाकर शेट्टी, अजित हेगडे, शेखर रेड्डी, संयुक्त अरब अमिराती (यूएई) बंटस संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रवीण शेट्टी आदी उपस्थित होते.

पटना कबड्डी संघाचा खेळाडू व तरुण कबड्डीपटू प्रशांत राय, जया शेट्टी व छाया शेट्टी या दाम्पत्यासह माला शेखर शेट्टी व बाळकृष्ण शेट्टी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत देश - परदेशातील समाजाच्या २१ बंटस संघानी कबड्डी, थ्रो बॉल व व्हॉलिबॉल अशा खेळांमध्ये आपला सहभाग नोंदविला.पाटील म्हणाले, आपल्या व्यवसायास पूर्ण वेळ देतानाच खेळासाठी बंटस संघाचे सदस्य कसा वेळ देतात हा माझ्यापुढे पडलेला प्रश्न आहे. महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांसह देशाच्या वेगवेगळ्या भागातील तसेच इतर देशातील बंटस संघाचे सदस्य खेळाच्या एकात्मिक भावनेतून एकत्र आले. संतोष शेट्टी यांनी पुढाकार घेतल्यामुळे हा क्रीडा महोत्सव पार पाडत आहे.त्यांचे उत्साही व्यक्तिमत्व आपल्या तरुणाईला प्रेरणा देण्याचे काम करते. पाच वर्षांपूर्वी बंटस समाजाने पुण्यात बंटारा भवन बांधले, त्याचा केवळ बंटस समाजालाच नव्हे, तर इतर समाजाला ही चांगला फायदा होऊ लागला आहे. समाज बांधवांसाठी बिनव्याजी कर्जाची सोय त्यांनी उपलब्ध करून देत एकमेकांना मदतीचा हात दिला आहे.'

संतोष शेट्टी म्हणाले, भारतासह विविध देशात बंटस समाज उद्योग - व्यवसायाच्या निमित्ताने विखुरलेला आहे. पुणे बंटस संघाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित क्रीडा महोत्सवाद्वारे या विखुरलेल्या सगळ्या बंटस संघाच्या सदस्यांना एकत्र आणण्याचे काम आमच्यातर्फे करण्यात आले. यानिमित्ताने व्यावसायिक, वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक देवाण घेवाण करण्याचे काम होऊ शकते